रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग ▌आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । वर्ष ८७ । अंक ३०८ । पृष्ठे ८ ▌ MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025) www.krushival.in


## गीतेंचा अर्ज १५ एप्रिल होणार दाखल

**अलिबाग :** रायगड लोकसभा निवडणुकीसाठी इंडिया आघाडीचे उमेदवार अनंत गीते सोमवारी (दि.१५) उमेदवारी अर्ज दाखल करणार आहे. सकाळी अकरा वाजता अर्ज दाखल केला जाणार असल्याचे सांगण्यात आले आहे. रायगड लोकसभा निवडणुकीनिमित्त १२ ते १९ एप्रिलपर्यंत उमेदवारी अर्ज दाखल केले जाणार आहेत. अलिबागमधील जिल्हाधिकारी कार्यालयात अर्ज दाखल करण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. इंडिया आघाडीचे उमेदवार अनंत गीते निवडणुकीच्या रिंगणात आहेत. सोमवारी सकाळी अकरा वाजण्याच्या सुमारास ते उमेदवारी अर्ज दाखल करणार आहेत. यावेळी आ. जयंत पाटील यांच्यासह अनेक नेते मंडळी उपस्थित राहणार आहेत.


# कृषीवल

रायगड, रविवार, दि. १४ एप्रिल २०२४

किंमत ४ ₹


# कार्यकर्त्यांनो कामाला लागा, गीतेंना निवडून द्या

## आ. जयंत पाटील यांचे आवाहन

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

**शेतकरी कामगार पक्षाने ज्यांना मदत केली. त्यांनी विश्वासघात केला आहे. याची चिड असंख्य कार्यकर्त्यांमध्ये निर्माण झाली आहे. या निवडणुकीत तटकरेंना चिरडून टाकायचा निर्धार केला आहे. त्यामुळे कार्यकर्त्यांनी अनंत गीतेंना प्रचंड मतांनी निवडून देण्यासाठी कामाला लागा, असे आवाहन शेकाप सरचिटणीस आ. जयंत पाटील यांनी केले. लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शेकापसह इंडिया आघाडीच्या वतीने कार्यकर्ता मेळावा शनिवारी (दि.१३) पांडबादेवी येथील जय मंगल कार्यालय येथे आयोजित करण्यात आला होता. त्यावेळी आ. जयंत पाटील बोलत होते.**

यावेळी इंडिया आघाडीचे उमेदवार अनंत गीते, माजी आ. पंडित पाटील, शेकाप जिल्हा चिटणीस ॲड. आस्वाद पाटील, रायगड जिल्हा परिषद माजी अर्थ सभापती चित्रा पाटील, रायगड बाजारचे चेअरमन नृपाल पाटील, काँग्रेसच्या जिल्हा महिला अध्यक्षा ॲड. श्रध्दा ठाकूर, उध्दव ठाकरे गटाचे जिल्हा प्रमुख सुरेंद्र म्हात्रे, किशोर जैन, विष्णू पाटील, अलिबागचे माजी नगराध्यक्ष प्रशांत नाईक, माजी उपनगराध्यक्षा ॲड. मानसी म्हात्रे, सवाई पाटील, शेकाप तालुका चिटणीस अनिल पाटील, पिंट्या ठाकूर, शिवसेना •› पान २ वर



## देश हुकूमशाहीच्या वाटेवर-गीते

जगातील सर्वात मोठी आदर्श लोकशाही म्हणून भारतातील लोकशाहीकडे पाहिले जाते. मात्र देशामध्ये भयावह परिस्थिती निर्माण झाली आहे. देशाबरोबरच लोकशाही, संविधान संकटात आहे. विरोधात बोलणाऱ्यांविरोधात ईडीमार्फत त्रास दिला जातो. ज्याप्रमाणे पुतीन यांनी विरोधक संपविण्याचा घाट घातला आहे. त्याप्रमाणे आपल्या देशातही विरोधक संपविण्याचा प्रयत्न सुरु केला आहे. चोर पावलाने हुकूमशाही येण्याची भिती निर्माण झाली आहे. आता राष्ट्रासाठी लढायचे आहे. लोकसभा निवडणुकीत इंडिया आघाडीचा उमेदवार म्हणून बहुमतांनी निवडून द्या, असे आवाहन अनंत गीते यांनी केले. •› पान २ वर






## महामानवाच्या जयंती निमित्त कार्यक्रम

**अलिबाग :** भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची आज (दि.१४) जयंती आहे. जयंतीनिमित्त जिल्ह्यात ठिकठिकाणी सामाजिक, सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. जिल्ह्यात ३३९ ठिकाणी जयंती साजरी केली जाणार असून ९४ ठिकाणी मिरवणुका काढण्यात येणार आहेत. •› पान २ वर

## शेकाप नेते बाबासाहेब करांडे यांचे निधन

**। सोलापूर । प्रतिनिधी ।**

सोलापूर जिल्हा परिषदेचे माजी सदस्य व शेतकरी कामगार पक्षाचे नेते बाबासाहेब करांडे यांचे शनिवारी (दि.१३) निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, एक मुलगी, सून, जावई, नातवंडे असा परिवार आहे. त्यांच्या पार्थिवावर आज सायंकाळी लोटवाडी ता.सांगोला येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.



यावेळी शेतकरी कामगार पक्षाचे सरचिटणीस आमदार जयंत पाटील, शेतकरी कामगार पक्षाचे पुरोगामी युवक संघटनेचे प्रदेश अध्यक्ष डॉ. बाबासाहेब देशमुख, युवा नेते अनिकेत देशमुख, मध्यवर्ती चिटणीस मंडळाचे पदाधिकारी एस. व्ही. जाधव, शेतकरी कामगार पक्षाचे पदाधिकारीकार्यकर्ते, विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. आजारी असल्याने बाबासाहेब करांडे यांच्यावर पुणे येथे उपचार सुरू होते. या उपचारा दरम्यानच त्यांचे निधन झाले. बाबा करांडे हे २००७ ते २०१२ दरम्यान जिल्हा परिषदेचे सदस्य होते, यापूर्वी सलग पाच •› पान २ वर










# माणगावचा खतनिर्मिती प्रकल्प रखडला

। माणगाव । सलीम शेख ।

तालुक्यात औद्योगिकीकरण झपाट्याने वाढत असतानाच माणगाव नगरपंचायत हद्दीत विविध कंपनीतील कामगार वर्ग व तंत्रज्ञ मोठ्या प्रमाणात येत आहेत. हे कामगार तालुक्याच्या ठिकाणी रहात असल्याने शहरीकरणावर अधिक ताण पडत आहे. याबरोबरच छोटे-मोठे व्यावसायिक, व्यापारी वाढत आहेत. पर्यायाने माणगावचे शहरीकरण, नागरिकरण झपाट्याने वाढत असताना या शहरात दैनंदिन निर्माण होणाऱ्या घनकचऱ्याचा प्रश्नही तितकाच बिकट बनत चालला आहे. माणगाव नगरपंचायतीच्या हद्दीत मोठ्या प्रमाणात निर्माण होणारा घनकचरा उचलून डम्पिंग ग्राऊंडवर टाकला जातो. मात्र या डम्पिंग ग्राऊंड भागात हा कचरा ठिकठिकाणी टाकल्याने तो परिसरात पसरत असून



या भागात दुर्गंधी पसरली आहे. त्यामुळे जनावरे व नागरिकांचे आरोग्य धोक्यात येत आहे. माणगाव नगरपंचायतीने खत निर्मिती प्रकल्पासाठी शासनाकडे प्रस्ताव पाठविला आहे. मात्र तो प्रस्ताव शासन स्तरावर प्रलंबित राहिल्याने हा प्रकल्प कागदावरच राहिला आहे.

मागील माणगाव नगरपंचायतीने हा कचरा उचलण्यासाठी निविदा काढून एका ठेकेदाराला हे काम दिले होते. त्यानंतर दरवर्षी शासनाच्या नियमाप्रमाणे या कचरा सफाई व विल्हेवाट लावण्याची निविदा दिली जाते. त्याप्रमाणे हा कचरा ठेकेदारामार्फत उचलून तो डम्पिंग ग्राऊंडवर टाकला जातो. या कचऱ्याचे ओला व सुका कचरा असे वर्गीकरण करून त्या कचऱ्याची योग्य ठिकाणी विल्हेवाट लावण्याचे प्रयोजन त्यांनी केले होते. त्यानंतर राष्ट्रवादीची नगरपंचायतीवरील सत्ता जावून शिवसेनेकडे ही नगरपंचायत आली. त्यानंतर ही नगरपंचायत आपल्या कार्यकाळात या कचऱ्याचे वर्गीकरण करून योग्य पद्धतीने विल्हेवाट लावून खत निर्मिती प्रकल्प राबवील अशी आशा नागरिकांना होती. मात्र नगरपंचायतीकडून बाजारपेठेतील उचललेला कचरा डम्पिंग ग्राऊंडवर टाकला जातो. तो कचरा हवेने पसरला जातो. तसेच या परिसरात ठिकठिकाणी कचऱ्याचे ढीग असल्याने तो अन्यत्र हवेने तसेच पाळीव जनावरांमुळे पसरून परिसरात रोगाची साथ येण्याची शक्यता नाकारता येत नाही. पावसाळा जवळ आला असून नागरिकांचे तसेच जनावरांचेही आरोग्य धोक्यात येत आहे. यासाठी माणगाव नगरपंचायत या डम्पिंग ग्राऊंडवर कचऱ्याचे वर्गीकरण करून खतनिर्मिती करण्यासाठी कधी पाऊल टाकणार असा सवाल नागरिकांमधून उपस्थित होत आहे.

माणगाव नगरपंचायतीपुढे खतनिर्मिती प्रकल्पासाठी नवीन आव्हान उभे राहिले आहे. या घनकचऱ्याचे व्यवस्थापन शास्त्रीय पद्धतीने व्यवस्थापन करून त्याची विल्हेवाट लावून या दैनंदिन गोळा केलेल्या कचऱ्यापासून खत निर्मिती करण्यासाठी महत्पपूर्ण पाऊल टाकावे. अशी नागरीकातून मागणी होत आहे. या गंभीर व महत्वाच्या प्रश्नात नगरपंचायतीने लक्ष देणे अपेक्षित आहे. त्यामुळे माणगावात डम्पिंग ग्राऊंडवर कचऱ्याची विल्हेवाट लावण्याचा प्रश्न पुन्हा एकदा चव्हाट्यावर येत आहे. त्यामुळे माणगाव स्वच्छ व सुंदर कधी होणार ? हा प्रश्नच आहे. या कचऱ्याची विल्हेवाट शास्त्रीय पद्धतीने कचऱ्याचे वर्गीकरण सुका, ओला, व प्लास्टिक व बाटल्या बाजूला करून माणगाव येथील नगरपंचायतीच्या जागेतील पाच एकर असणाऱ्या डम्पिंग ग्राऊंडवर विल्हेवाट लावून खत निर्मिती करावयाचे प्रयोजन होते. माणगाव नगर पंचायतीला डम्पिंग ग्राऊंडच्या जागेची भेडसावणारी समस्या शासनाने सोडवली. त्यानुसार शासनाची पाच एकर जागा नगरपंचायतीला उपलब्ध झाली. असल्याचे समजते. मात्र हा कचरा उघड्यावर टाकल्याने कचऱ्याचा प्रश्न अधिकच गंभीर बनला असून खतनिर्मिती प्रकल्पावर प्रश्नचिन्ह उभारले आहे.

## अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

१४ एप्रिल

१) श्री. जालीन्दर फकीरा सदाफुले श्रीबाग-२ अलिबाग, १४-४-१९५०

२)श्री.दत्तात्रेय बाल्या पेरेकर अलिबाग कोळीवाडा, १४-४-१९४९

३)श्रीम.स्मिता मनोहर सुर्वे चेंढरे, अलिबाग १४-४-१९५४

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा)**
**९२२६०५५१५५ (अमित शहानंद)**

**- मुख्य संपादक, कृषीवल**

### आजचे अन्नदाते



**स्व. श्रीमती कलावती भवानजी देढीया, स्मरणार्थ महावीर ट्रेडर्स बाजार पेठ अलिबाग**

**अंकुर ड्रायफ्रूट्स, बाजार पेठ अलिबाग**

# संजोग वाघेरे-पाटील यांची प्रचारात आघाडी

। रसायनी । वार्ताहर ।

मावळ मतदारसंघात लोकसभा निवडणुकीचे मतदान १३ मे रोजी होणार असल्याने गावभेठी, आढावा बैठकांना सुरुवात झाली आहे. महाविकास आघाडीचे उमेदवार संजोग वाघेरे-पाटील यांचा रसायनी पाताळगंगा परिसरातील वडगाव विभागातील गावांना भेट दिली व नागरिकांशी संवादही साधला. भर उन्हात कसलीही पर्वा न करता महाविकास आघाडीचे उमेदवार संजोग वाघेरे-पाटील यांचा गावभेटी दौरा पाहून लोकसभा निवडणुकीत ते मोठ्या मताधिक्याने विजयी होतील अशा चर्चा नागरिकांतून ऐकावयास मिळाल्या.

सर्वसामान्य जनतेमध्ये मिसळण्याचा संजोग वाघेरे-पाटील यांचा स्वभाव असल्यामुळे जनतेला त्यांचा स्वभाव भावतो. आपला हक्काचा माणूस आपल्याला येऊन भेटून व आपले प्रश्न जाणून घेत असल्याने महाविकास आघाडीच्या कार्यकर्त्यांत नवचैतन्याचे वातावरण तयार झाल्याचे



दिसून येते. या दौऱ्याला तुपगाव येथून सुरुवात होवून सारंग, आसरोटी, टेंभरी, वयाला, वडगाव, वाशिवली, बोरिवली, कैरे, वाणिवली, तळवली, लोहोप, कोपरी, इसांबे, आंबवली, माजगाव, वारद, पौंध, आसरे, नडोदे, निगडोली, माडप, खरसुंडी, कुंभीवली, वडवल, तांबाटी, खिरकींडी, डोणवत, गोरठण, वणवठे, सावरोली व धामणी आदी गावांना भेटी देण्यात आल्या.

यावेळी शिवसेना खालापूर तालुका अध्यक्ष एकनाथ पिंगळे, माजी जिल्हा परिषद सदस्य मोतीराम ठोंबरे, काँग्रेसचे तालुकाध्यक्ष कृष्णा पारंगे, उत्तम भोईर, वासांबे विभागप्रमुख शशिकांत मुकादम, विभागीय संपर्कप्रमुख अनिल पिंगळे, माजी सरपंच गौरी गडगे, अशोक मुंढे, विधानसभा महिला संघटक प्रिती कडव, तालुका महिला संघटक चित्रा मैदर्गीकर, महिला विभागप्रमुख सदगुणा पाटील आदीसह मोठ्या संख्येने पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# वणव्यामुळे तापमानवाढीचा कहर

## ■ वणवा प्रतिबंधक उपायांचे मजुरी दर अत्यल्प

। पोलादपूर । प्रतिनिधी ।

तालुक्यातील सह्याद्री रांगांतील वणव्यांचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे. परिणामी, दिवसाच्या आणि रात्रीच्या तापमानात कमालीची वाढ झाल्याचे दिसून येत असून, तापमानवाढीचा कहर झाल्याचे दिसून येत आहे. सकाळी सहा वाजेपर्यंत २३ अंश सेल्सियस तापमान असताना चार तासांनंतर ३१ अंश आणि दुपारी साडेतीन वाजेपर्यंत ४२ अंश सेल्सियस तापमान वाढल्याचे दिसून येत आहे. वन विभागामार्फत वणवा प्रतिबंधक उपायांचे मजुरी दर अतिशय अत्यल्प असल्याने प्रतिबंधात्मक उपायांसाठी कोणीही पुढे सरसावत नसल्याने ते दर वाढविण्याची आवश्यकता व्यक्त होत आहे.

कोकणात ऑक्टोबर हिटपासून डोंगरमाथा गरम होऊन वणवे लागण्यास सुरूवात होत असते. या वणव्यांचा सर्वात जास्त कालावधी मार्च ते मेदरम्यानच्या आर्द्रता कमी होऊन उष्णता वाढीमध्ये दिसून येत असून, वणवा टाळण्यासाठी अथवा थांबविण्यासाठी चार ते सहा फूट रूंदीचे लांबपर्यंत चर खणून चरातील गवत काढून वणव्यांना थोपविण्याचा उपाय केला जातो. मात्र, वनविभागाकडून या चरासाठी अतिशय अत्यल्प मजुरी दर दिला जात असल्याने स्थानिक वनमजुरांना हा मजुरीचा दर परवडत नसल्याने ही कामे करण्यासाठी कोणीही धजावत नाही. यामुळे कामाविनाच बिले काढून काम झाले. मात्र, वणवाच मोठा असल्याने चर खणूनही वणवा पसरल्याचे कारण पुढे करून वणव्यांच्या उपायांच्या अत्यल्पदराच्या निरूपयोगीतेचा गैरफायदा घेतला जात आहे.

पोलादपूर तालुक्यातील वाकण गोपाळवाडी ते पितळवाडीच्या नदीपात्रापासून रस्त्यापर्यंतच्या भागामध्ये साधारणपणे ३ कि.मी. रस्त्याच्या एका बाजूला लागलेल्या वणव्यामुळे प्रचंड उष्णता निर्माण होऊन अनेक झाडांना जिवंत अग्निप्रवेश मिळाल्याने झाडांच्या फांद्या आणि बुंधे करपून झाडे निष्पर्ण झाल्याचे पाहायला मिळाले. काही झाडे बुंध्यात पेटून रस्त्यावर कोसळल्याचेही दिसून आले. या वणव्यामध्ये पोलादपूर तालुक्यातील पक्षी व वनसंपदेचे नुकसान झाले आहे.

# श्रीवर्धनकर मंत्रमुग्ध

**श्रीवर्धन :** 'मन करा रे प्रसन्न' या डॉ. संजय उपाध्ये यांच्या एकपात्री, धमाल विनोदी पण नॉन अध्यात्मिक कार्यक्रमाने श्रीवर्धनचे शेकडो श्रोते अक्षरशः मंत्रमुग्ध होऊन गेले. निमित्त होते कोकण मराठी साहित्य परिषद,श्रीवर्धन शाखेच्या विसाव्या वर्धापन दिन समारंभाचे. श्रीवर्धन येथील श्री दत्त मंदिर सभागृहामध्ये मन करा रे प्रसन्न हा धमाल कार्यक्रम सादर करण्यात आला.

कार्यक्रमाच्या प्रारंभी अतिथींच्या हस्ते दीप प्रज्वलन करण्यात आले.कार्यक्रमास को.म.सा.प. रायगडचे अध्यक्ष सुधीर शेठ, समन्वयक अ.वि. जंगम हे प्रमुख अतिथी म्हणून आमंत्रित होते. सुधीर शेठ यांनी आपल्या मनोगतांत श्रीवर्धन शाखेच्या विविध उपक्रमांचे कौतुक केले. तद्नंतर उपाध्यक्ष प्रसाद जोशी यांनी प्रास्ताविक केले. मन करा रे प्रसन्न हा कार्यक्रम सुरु झाल्यापासून संपेपर्यंत दीड ते दोन तास श्रीवर्धनच्या रसिक प्रेक्षकांनी डॉ.संजय उपाध्ये यांच्या वाक्यावाक्याला आणि मिश्कील व मर्म विनोदी प्रवचनाला उत्स्फूर्त दाद दिली. कार्यक्रमात डॉ. उपाध्ये यांनी मनुष्य स्वभावाचे विविध नमुने, सवयी, जीवनाचा अर्थ आदी गहन विषय अत्यंत लीलया आणि बौद्धिक विनोदांच्या माध्यमातून प्रभावीपणे मांडले.

# उरण-बांधपाडा येथे डेंग्यूची साथ

। उरण । वार्ताहर।

उरण तालुक्यातील बांधपाडा ग्रुप ग्रामपंचायत परिसरात डेंग्यू मलेरियाचे रुग्ण आढळले असल्याने रहिवाशांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. नागरिकांनी घाबरून न जाता प्राथमिक आरोग्य केंद्रातील डॉक्टरांकडून तपासणी करून घ्यावी, असे आवाहन उरण तालुका वैद्यकीय अधिकारी डॉ. राजेंद्र इटकरे यांनी केले आहे.

जेएनपीए बंदरामुळे उरण तालुक्यातील बांधपाडा ग्रुप ग्रामपंचायत हद्दीत मोठ्या प्रमाणात मालाची हाताळणी करणाऱ्या गोदामाच्या संख्येत वाढ होत आहे. मात्र स्थानिक ग्रामपंचायतीने सदर गोदामाला ना हरकत दाखला देताना त्या गोदामातील घाणीची, सांडपाण्याची विल्हेवाट कुठे लावण्यात येणार याचा लेखाजोखा घेतला जात नाही. त्याचा त्रास नाहक ग्रामस्थांना सहन करावा लागत आहे. ग्रामपंचायतीच्या ढिसाळ कारभारामुळे गावात सध्या तुंबलेली गटारे, भेडसावणारी पाण्याची समस्या या सारख्या अनेक समस्यांनी डोके वर काढले



आहे. यामुळे उन्हाळ्याच्या दिवसात परिसरात डासांची उत्पत्ती होत असून डेंग्यू, मलेरियासारखे रुग्ण आढळले आहेत. उरण तालुका आरोग्य विभागाचे तालुका वैद्यकीय अधिकारी डॉ.राजेंद्र इटकरे आणि त्यांच्या संपूर्ण पथकाने गाव परिसराची पाहणी करून रुग्णांची तपासणी केली. यावेळी ॲड. सत्यवान भगत, अंगणवाडी सेविका, बांधपाडा ग्रामपंचायतचे उपसरपंच रितेश ठाकूर, सुजित म्हात्रे, देवानंदन पाटील, राजश्री पाटील आणि ग्रामपंचायत कर्मचारी उपस्थित होते.

बांधपाडा हद्दीत सांडपाण्याची विल्हेवाट योग्य प्रकारे होत नाही. त्यामुळे डासांची पैदास होते. रहिवाशांनी घाबरून न जाता आपला परिसर स्वच्छ ठेवण्यासाठी पुढाकार घ्यावा. आज जे रुग्ण आढळले आहेत. त्याची तपोसणी करण्यात आली आहे. ग्रामपंचायतीने योग्य खबरदारी घेतली तर गावात अशा प्रकारची समस्या निर्माण होणार नाही. ग्रामस्थांनी घाबरून न जाता आजाराची लक्षणे दिसत असल्यास डॉक्टरांकडून तपासणी करून घ्यावी, असे डॉ. राजेंद्र इटकरे यांनी सांगितले.

# पर्यटकांना वाहतूक कोंडीचे विघ्न

**खांब :** महामार्गाच्या रूंदीकरणाच्या कामाचा फटका सर्वांना बसत असतानाच आज महामार्गावरील वाहतूक कोंडीचा फटका सर्वत्र सुरू असलेल्या लग्न समारंभास व पर्यटनासाठी निघालेल्या पर्यटकांना चांगलाच बसला आहे. गेली १४ वर्षे महामार्गाच्या रूंदीकरणाचे कासवगतीने सुरू असलेले काम कधी एकदा मार्गी लागतेय. याकडेच साऱ्यांचे लक्ष लागून राहिले आहे.तर दैनंदिन जीवनात महामार्गावरुन प्रवास करताना प्रवासी व वाहनचालक यांना महामार्गावरून प्रवास करताना अनंत अडचणींचा सामना करावा लागत आहे. याशिवाय अर्धवट स्वरूपात असलेल्या बांधकामामुळे छोटे मोठे अपघात देखील घडताना दिसत आहे.त्यामुळे मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्ग अजून किती बळी घेणार हा प्रश्न मात्र अनुत्तरितच राहिला आहे.

# आसल गावचा प्रणव बनला डॉक्टर

। कर्जत । वार्ताहर ।

तालुक्यातील आसल या गावातील रहिवासी असलेले सुनील गायकवाड यांचे सुपुत्र प्रणव यांनी मेडिकलमधील एमबीबीएस ही पदवी प्राप्त करून यश संपादन केले असून त्यांनी शिक्षण घेतलेल्या केईम रुग्णालयातच त्यांना इंटनशिप करण्याची संधी मिळाली आहे.

प्रणव याने दहावीच्या परीक्षेत ९६ टक्के गुण, तसेच बारावीच्या परीक्षेत ८७ टक्के गुण मिळवून उत्तीर्ण झाला. मेडिकल शिक्षण घेण्यासाठी आवश्यक असलेली नीट परीक्षा ५४७/७२० पैकी गुण मिळवून यशस्वीपणे पार पाडली. मुंबई येथील केईएम वैद्यकीय महाविद्यालय प्रवेश मिळविला आणि आता २०२४ मध्ये एमबीबीएस ही पदवी मिळविली. ग्रामीण भागातील पहिलाच एमबीबीएस विद्यार्थी असल्याने प्रणव गायकवाड यांचे सर्वत्र कौतुक होत आहे. डॉ प्रणव यांचे वडील हे नेरळ विद्या मंदिर शाळेत शिक्षक असून त्यांनी पदवी अभ्यासक्रम पूर्ण करून यावर्षी शिवाजी विद्यापीठामधून विधी शाखेची पदवी मिळविली आह. त्यांची आई या शासकीय आश्रमशाळेत शिक्षिका म्हणून कार्यरत आहेत. त्यामुळे घरातील शिक्षणमय वातावरण असल्याने प्रणवला घरातूनच चांगल्या संस्काराचे धडे मिळाले. डॉ. प्रणव यांना त्यांनी मेडिकलचे शिक्षण पूर्ण केलेल्या केईएम रुग्णालयातच इंटरशिप करण्याची संधी मिळाली आहे. इंटरशिपच्या या काळात ते ग्रामीण भागात वैद्यकीय अधिकारी म्हणून ठाणे जिल्ह्यातील ग्रामीण भागातील प्राथमिक आरोग्य केंद्रात सेवा देणार आहेत.

पान १ वरून



## कार्यकर्त्यांनो कामाला लागा, गीतेंना निवडून द्या

तालुका प्रमुख शंकर गुरव, दिपश्री पोटफोडे, प्रदिप नाईक, वृषाली ठोसर, अनिल चोपडा, अजय गोजी, बाळु पाटील, स्नेहल देवळेकर, सुधीर थळे आदी शेकापचे पदाधिकारी, कार्यकर्ते, तसेच इंडिया आघाडीचे पदाधिकारी कार्यकर्ते, महिला, तरुणवर्ग उपस्थित होते.

याप्रसंगी मार्गदर्शन करताना, आ. जयंत पाटील म्हणाले की, शेतकरी कामगार पक्षाने शाहू, फुले आंबेडकरांचे विचार घेत समाजाच्या हितासाठी काम केले आहे. कार्यकर्ता हाच पक्षाचा आत्मा आहे. हे जाणून श्रमजीवी, कष्टकरी जनतेला केंद्रबिंदू मानून काम केले आहे. नाना पाटील यांच्यानंतर आज पाचवी पिढी जनतेची सेवा करीत असल्याचे समाधान आहे. देशात, राज्यात राजकारण दिवसेंदिवस बदलत आहे. अनेकजण स्वतःच्या स्वार्थासाठी पक्ष बदलत आहेत. मात्र शेकापक्षाचे निष्ठावंत कार्यकर्ते आपल्या विचाराशी आजही ठाम आहेत. त्याचा मला अभिमान आहे. आता आपल्याला या निवडणूकीत एक वेगळ्या उमेदीने काम करायचे आहे. वेगळ्या पध्दतीने काम करून अनंत गीते यांना निवडून दयायचे आहे. रायगडसह खारेपाटातील कार्यकर्ता पेटून उठला आहे. शेकापच्या शेपटीवर पाय देण्याचा प्रयत्न केलात, तर लक्षात ठेवा, पुन्हा कधीच उभे राहणार नाही, असे आ. जयंत पाटील यांनी आक्रमक होऊन सुनील तटकरे यांना टोला लगावला.

शेतकरी कामगार पक्षाचे आमदार म्हणून विधी मंडळात काम करीत असताना आपल्या विचाराशी, तत्वाशी ठाम राहिले आहे. परंतु सध्याचे लोकप्रतिनिधी टक्केवारीसाठी लाचार होताना दिसून येत आहे. कारण यांची बांधिलकी पैसेवाल्यांबरोबरच, टक्केवारी वाल्यांसोबत राहिली आहे, असे आ. पाटील म्हणाले. शेतकरी कामगार पक्ष हा कार्यकर्ता घडविणारा कारखाना आहे. विरोधातील अनेक कार्यकर्ते शेकापच्या तालीमीतून शिकले आहेत. ज्यांना घडविले, मोठे केले, ते विरोधात गेले. त्यांना लहान करायला वेळ लागणार नाही. हे विरोधकांनी लक्षात ठेवावे, असा इशारा जयंत पाटील यांनी दिला.

## देश हुकूमशाहीच्या वाटेवर-गीते

भविष्यात अलिबागचा आमदार इंडिया आघाडीचा असणार आहे. जिल्हा परिषदमध्येदेखील एक हाती सत्ता घ्यायची आहे. एक वेगळा इतिहास या जिल्ह्यातून घडवायचा आहे. त्यासाठी कार्यकर्त्यांनी कामाला लागावे.

बॅ. अंतुले यांनी राजकीय जन्म दिला, पवारांनी नावलौकीक दिले. तसेच शेकापचे जयंत पाटील यांनी बळ दिले. त्यांच्याच पाठीत खंजीर खुपसण्याचे काम सुनील तटकरे यांनी केले आहे. काँग्रेसचे नेते माजी आ. मधुकर ठाकूर यांचादेखील तटकरेंनी विश्वासघात केला आहे. अशा विश्वासघातकी माणसाला शिक्षा झालीच पाहिजे. या निवडणुकीत त्यांना त्याची जागा दाखविण्यासाठी कार्यकर्त्यांनी सज्ज व्हा. तटकरेंना रायगडमधील टकमक टोक दाखविल्याशिवाय जनता राहणार नाही, असे गीते म्हणाले. पुढे ते म्हणाले की, सध्या महाराष्ट्रात गलिच्छ राजकारण सुरु आहे. शिवसेनेचा हात पकडून केंद्रात, राज्यामध्ये सत्तेत येणाऱ्या भाजपने शिवसेना फोडली. इतक्यात थांबले नाही, तर राष्ट्रवादी त्यानंतर काँग्रेस फोडली.

ज्या प्रमाणे बकासूर भुक भागविण्यासाठी अनेकांना खात होता. त्याप्रमाणे पक्ष फोडून आमदार घेण्याचे काम भाजपने केले आहे. या बकासुराचा वारस महाराष्ट्रात आहे. त्या बकासुराचा वध महाराष्ट्राची जनता भीमाच्या रुपाने करणार आहे, असा विश्वास गीते यांनी व्यक्त करीत राज्यात पसरलेला अंधार इंडिया आघाडीच्या मार्फत दुर करू, या असे आवाहन केले.

**गीतेंचा विजय मीनाक्षी पाटील यांना श्रध्दांजली ठरेल-पंडित पाटील**

इंडिया आघाडीचे उमेदवार अनंत गीते यांचा खासदार, मंत्री म्हणून दिल्लीमध्ये एक वेगळा दबदबा राहिला आहे. गीतेंसारखा प्रामाणिक उमेदवार शोधून सापडणार नाही. ज्यांना शेकापच्या मदतीने खासदार केले. त्यांचे दिवस आता बोटावर मोजण्या इतकेच राहिले आहेत. आपला विजय हा नक्कीच आहे. या निवडणुकीत गीतेंना बहुमतांनी निवडून देण्यासाठी कार्यकर्त्यांनी कामाला लागा. इंडिया आघाडीच्या माध्यमातून जिल्ह्यात चांगल्या पध्दतीने काम सुरु आहे. ही आघाडी कायम राहिली पाहिजे. आपली लढाई ही श्रमशक्ती विरुध्द धनशक्ती अशी आहे. त्यामुळे प्रत्येक कार्यकर्त्यांनी जिद्दीने अनंत गीतेंना निवडून द्यायचे आहे. अनंत गीतेंचा विजय हा खऱ्या अर्थाने माजी राज्यमंत्री मीनाश्री पाटील यांना श्रध्दांजली ठरणार आहे, असे पंडित पाटील म्हणाले.

**जिल्ह्यातील प्रश्न सोडविण्यासाठी गीते कटीबध्द राहणार- चित्रा पाटील**

आंबेडकर, शाहू यांच्या पुरोगामी विचारसरणीच्या, शेतकरी कामगार पक्षाच्या संपन्न अशा कुटुंबामध्ये जन्माला आलेल्या, अतिशय अभ्यासू, कर्तृत्ववान व्यक्तिमत्व, सहकार क्षेत्रामध्ये चांगल्या प्रकारे चळवळ करणाऱ्या मनमिळावू स्वभावाच्या आणि लोक कल्याणासाठी संपूर्ण आयुष्य ज्यांनी चळवळीसाठी उभं केले, त्या रायगडच्या रणरागिणी मीनाक्षी पाटील. त्यांच्या निधनानंतर ही पहिली राजकीय सभा आहे. मीनाक्षी पाटील यांनी शेकाप नेते जयंत पाटील, माजी आ. पंडित पाटील, ॲड. आस्वाद पाटील आणि त्यांच्या संपूर्ण कुटुंबियांना एकत्र बांधून राजकीय वाटचाल करण्याची शिकवण दिली. लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर घेण्यात आलेल्या या सभेत आज मोठ्या संख्येने महिला सहभागी झाल्या आहेत. या महिलांचे प्रश्न सोडविण्यासाठी तसेच खारेपाटातील अनेक प्रश्न मार्गी लावण्यासाठी अनंत गीते कटीबध्द राहतील, असा विश्वास आहे, असे जिल्हा परिषद माजी अर्थ सभापती चित्रा पाटील यांनी प्रस्तावनेत सांगितले.

**भाजपला हद्दपार करण्याची गरज- ॲड. श्रध्दा ठाकूर,**

लोकसभा २०२४ ही निवडणूक महत्वाची आहे. वेगवेगळ्या सुरक्षा यंत्रणेचा आधार घेत सत्ताधाऱ्यांविरोधात बोलणाऱ्यांना वेठीस धरण्याचे काम केले जात आहे. ज्याप्रमाणे रशियामध्ये पुतिन यांच्यामार्फत विरोधक नष्ट करण्याचे काम केले जात आहे. त्याप्रमाणे आपल्या देशात परिस्थिती निर्माण केली जात आहे. भारतीय संविधानाने समानता निर्माण केली आहे. ही समानता नष्ट करण्याचे काम केले जात आहे. त्यामुळे या निवडणुकीत मोदीसह भाजपला हद्दपार करण्याची गरज आहे. त्यामुळे रायगड लोकसभा निवडणुकीत गीतेंना भरघोस मतांनी निवडून द्या, असे आवाहन रायगड जिल्हा काँग्रेसच्या महिला अध्यक्षा ॲड. श्रध्दा ठाकूर यांनी केले.

## शेकाप नेते बाबासाहेब करांडे यांचे निधन

वर्ष ते लेबर फेडरेशनचे चेअरमन राहिले होते. सध्या ते लेबर फेडरेशनवर संचालक होते. सोलापूर जिल्ह्यातील कर्मचारी चळवळीचे नेते म्हणून त्यांची ओळख होती. जिल्हा परिषद चालक यांच्या विविध प्रश्नावर त्यांनी आवाज उठवला होता.

सोलापूर जिल्हा वाहन चालक संघटनेचे अध्यक्ष होते. त्यानंतर राज्याचे वाहन चालक संघटनेचे अध्यक्ष झाले तर नंतर सोलापूर जिल्हा परिषद मध्यवर्ती कर्मचारी संघटना सर्व संघटनांची समन्वय समिती स्थापन केली. पतसंस्था क्रमांक दोनचे मार्गदर्शक मोलमजुरांसाठी स्वतंत्र पतसंस्था स्थापन केली नंतर त्याचे रूपांतर पतसंस्था क्रमांक तीनमध्ये करण्यात आले. कर्मचाऱ्यांवर अन्याय झाल्यानंतर वेळोवेळी अत्यंत कडक शब्दात प्रशासनाबरोबर प्रखर विरोध करून कर्मचाऱ्यांना न्याय देण्याची भूमिका त्यांची असायची.

कर्मचाऱ्यांना न्याय मिळण्यासाठी प्रशासनाशी कधी तडजोड केली नाही. सर्व संघटनांची अत्यंत सलोख्याचे समन्वयाचे संबंध ठेवल्याने कर्मचारी संघटनेचे वज्रमुठ बांधली होती. त्यांच्या कालावधीतच तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या विरोधात आंदोलन केले त्यानंतर त्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांची पाच दिवसात बदली सुद्धा झाली. अशा पद्धतीचे काम बाबा कारंडे यांचे होते.

## महामानवाच्या जयंती निमित्त कार्यक्रम

रायगड जिल्ह्यातील अलिबाग, मुरुड, रोहा अशा अनेक तालुक्यांमध्ये वेगवेगळ्या संस्था, संघटना व मंडळाच्या वतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची जयंती साजरी केली जाणार आहे. अलिबाग शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास पुष्पहार घालून अभिवादन केले जाणार आहे. अलिबाग नगरपरिषदेसह भारतीय बौध्द महासभा व बौध्दजन पंचायत समितीच्या वतीने विविध कार्यक्रम आयोजित केले आहेत.

अलिबाग तालुक्यातील महाजने, मल्याण, रेवदंडा, गोविंद बंदर, शास्त्रीनगर, कुरुळ, बेलकडे, रामराजसह जिल्ह्यातील रोहा, श्रीवर्धन, म्हसळा, माणगाव, महाड आदी ठिकाणी जयंती सोहळा साजरा केला जाणार आहे. जिल्ह्यामध्ये ७६ पुतळ्यांसह २३६ प्रतिमांचे पूजन केले जाणार आहे. तसेच यावेळी सामाजिक उपक्रमातून शाळकरी मुलांना शालेय साहित्य वाटप केले जाणार आहेत. गुणगौरव सोहळ्यासह वेगवेगळ्या क्षेत्रातील कर्तृत्ववान व्यक्तींचा सन्मान केला जाणार आहे.

आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)


निवडक

## गायबगळा पक्षाला जीवदान

**कोर्लई :** लक्ष्मीखार येथील इकरा अफसरखान यांच्या घराच्या मागील बाजूस जखमी अवस्थेत आढळून आलेल्या गायबगळा पक्षाला सर्पमित्र संस्थेचे सदस्य संदीप घरत यांनी वनपरिक्षेत्र अधिकारी प्रियांका पाटील, वनपाल विजय कोसबे यांच्या सहकार्याने पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. विजय पवार यांनी औषधोपचार करून मुक्त विहारासाठी सुरक्षितपणे सोडून दिले. यांनी तत्परने जखमी गायबगळा पक्षाला जीवदान मिळाल्याबद्दल पक्षीमित्र प्रेमींकडून कौतुक होत आहे.

## काव्य संग्रहाचे लोकार्पण

**धाटाव :** रोहा तालुक्यातील शेणवई गावच्या उज्वला देशमुख(गोळे) लिखित 'उज्वल' काव्यसंग्रहाचे रोह्यात लोकार्पण करण्यात आले. कविता, लेख लिहिण्याबरोबर नाट्य लेखनाचा छंद जडला. हळूहळू लेखन करून त्यांनी सर्व संग्रहित करून ठेवले त्यानंतर त्यांनी हा काव्यसंग्रह लोकांपर्यंत पोहचावा या उद्देशाने त्यांनी रोह्यात सखीमंच कार्यक्रमात संग्रह प्रकाशित केला. यावेळी स्नेहा आंब्रे, पूजा पोटफोडे, उदय देशमुख यांसह असंख्य मान्यवर उपस्थित होते.

## मुरुड पोलिसांचे संचलन

**आगरदांडा :** मुरुड पोलीस स्टेशन वतीने शनिवारी (दि.१३) आगामी लोकसभा निवडणूक व येणारे सणाच्या पाशर्वभूवर परेशनाका येथे 'दंगा काबू योजना' राबविण्यात आली. तसेच येणाऱ्या निवडणुका निर्भय व शांततेत पार पाडावी याकरिता संचलन घेण्यात आला. संचलन एकदरा गाव येथून सुरू होऊन बाजारपेठ मार्गे, पेठ मोहल्ला लक्ष्मिखार येथून दत्तवाडी येथे समाप्त झाला. यावेळी विनीत चौधरी, निरीक्षक निशा जाधव,अविनाश राठोड, अविनाश पाटील आदींनी सहभाग घेतला.

## चार ग्रामपंचायतीवर प्रशासक

**मुरूड :** डिसेंबर २०२३ मध्ये मुदत संपणाऱ्या मुरूड तालुक्यातील खारअंबोलीसह सावली, मजगाव, उसरोली या चार ग्रामपंचायतीवर प्रशासकांची नेमणूक करण्यात आली आहे. खारअंबोली व उसरोलीकरिता प्रशासक म्हणून कृषी विभागाचे विस्तार अधिकारी वसंत दळवी, सावली प्रशासक म्हणून आरोग्य पर्यवेक्षक राजेश वाडेकर तर मजगाव प्रशासक विस्तार अधिकारी सांख्यिकी प्रसाद माळी यांची नेमणूक करण्यात आल्याची माहिती मुरूड पंचायत समितीतर्फे देण्यात आली.

## आरोग्य तपासणीस प्रतिसाद

**माथेरान:** माथेरानमध्ये शिवराय, फुले, शाहू, आंबेडकर संयुक्त जयंती महोत्सवाचे औचित्य साधत भारतीय बौद्ध महासभा, व माथेरान गिरीस्थान नगरपरिषद यांच्या संयुक्त विद्यमाने आरोग्य तपासणी करण्यात आली. तेरणा मल्टि-स्पेशालिटी हॉस्पिटल आणि रिसर्च सेंटर- नेरुळ (नवी मुंबई) व समर्पण ब्लड बँक, घाटकोपर यांच्या सहकार्यातून व रजनीश शुक्ला व सार्वजनिक रक्तदाते राजाभाऊ कोठारी यांनी आरोग्य तपासणीस सहकार्य केले.

### खारेपाटात पाय ठेवण्याचा तटकरेंना नैतिक अधिकार नाही

# अनंत गीते आदर्शवत लोकप्रतिनिधी

### पेण तालुक्यातील वढाव, कासू येथील सभेत आ. जयंत पाटील यांच्याकडून गीतेंचे कौतुक, तर तटकरेंच्या लबाड वृत्तीचे दिले दाखले

। पेण । प्रतिनिधी ।

हीी निवडणूक एकतर्फी होणार आहे. कारण मोदींना जनता कंटाळली आहे. खताच्या पोत्याला २० टक्के जीएसटी लावून सरकार ६००० ची गॅरंटी देते. पण १५ लाखाच्या गॅरंटीचे काय झाले? ४०० शहर स्मार्ट होणार होती कुठे आहेत ती? गीतेंवर एक तरी भ्रष्टाचाराचा डाग आहे का? या भागातील रस्ते आणि अनेक विकासकामांची यादी खूप मोठी करता येईल. गीतेंकडे आदर्शवत लोकप्रतिनिधी म्हणून बघतो. आम्ही आयुष्यात कोणाला फसवले नाही. आम्ही तत्वनिष्ठ आहोत आणि म्हणूनच बिनशर्थ पाठिंबा दिला. हेच शेकापचे वैशिष्ट्य आहे असे सांगत आता तटकरेंच्या विरोधात का? याचा खुलासा अजूनही कुणाला करायचा असेल, त्यांनी आमंत्रण द्यावं. मी चर्चेसाठी येतो. स्वच्छ चारित्र्याच्या गीतेंना मते भरघोस द्या, असे आवाहन करत पेण तालुक्यातून गीतेंना सर्वाधिक मते मिळणार, असा विश्वास आ. जयंत पाटील यांनी व्यक्त केला. कासू येथे इंडिया आघाडीची प्रचार बैठक शुक्रवारी (दि.१२) रात्री उशिरा संपन्न झाली. त्यावेळी ते बोलत होते.



यावेळी शिवसेना संपर्क प्रमुख विष्णुभाई पाटील, अतुल म्हात्रे, शिवसेना जिल्हा अध्यक्ष सुरेंद्र म्हात्रे, जि.प. माजी सदस्य किशोर जैन, शेकाप पक्षाचे शिक्षण महर्षी पी.डी.पाटील, काँग्रेसचे अशोक मोकल, सेवा निवृत्त तहसिलदार सुभाष म्हात्रे, अविनाश म्हात्रे, शिवसेना तालुका अध्यक्ष जगदीश ठाकूर, मिहिर धारकर, अनंत पाटील, शेकाप वाशी सरपंच संदेश ठाकूर, विधानसभा समन्वय समीर म्हात्रे, रायगड जिल्हा संघटीका दिपश्री पोटफोडे, शेकाप पक्षाच्या स्मिता पाटील तसेच खारेपाट विभागातील कार्यकर्ते हजर होते.

यापुढे आ. जयंत पाटील म्हणाले की, तटकरे म्हणतात गीतेंचे एक तरी काम दाखवा, या विभागातील चाळीस गावांना मोफत पाणी जेएसब्लू कंपनी देते, हे गीतेंचे काम आहे. आता त्यांनी अंतिम ग्रामपंचायतला एक लाख रुपये आणून द्यावेत; आणि त्यांनी किती प्रकल्प आणले आणि नोकऱ्या दिल्या हे सांगावे, असा हल्लाबोल आ. जयंत पाटील यांनी केला.

पुढे ते म्हणाले की, तटकरे यांनी फक्त एकच काम केलं ते म्हणजे कन्येला जि. प. अध्यक्ष, मुलाला आमदार आणि स्वतःला खासदार. मागे तटकरे यांना पुरोगामी म्हणून पाठिंबा दिला होता. मात्र, सहा महिन्यात त्यांनी रंग बदलले आणि आमची फसवणूक केली. मला बोलायला मर्यादा आहेत; पण तरीही सांगतो ५० टक्के भूमिपुत्रांना जमिनी द्या, असा सुप्रीम कोर्टाचा कायदा आला. त्यामुळे आम्ही त्यासाठी लढतोय. आम्ही तिसऱ्या मुंबईत राहत असल्याने आम्हाला प्लॅनिंग कळाले पाहिजे. आम्हाला एफएसआय प्लॅन सांगा आणि मग आम्ही करार करु. एमएमआरडीए विकसित करत असलेल्या प्रदेशात आमच्या पाठीशी राहा, असे जाहीर निवेदन त्यांनी गीते यांना केले. आम्ही पनवेलचा नयना प्रकल्प हटवला, हे सांगतानाच एफएसआयचे गणित सांगत त्यांनी आम्हाला पेणला सुद्धा एका एकराला किमान शंभर कोटी हवेत; त्यासाठी आम्ही प्रयत्न करतोय, असेही ते यावेळी म्हणाले.

यापुढे गीते यांनी सांगितले की, लोकशाही संकटात आली तर विचार आणि मतस्वातंत्र्य जाणार. जिनपिंग आणि पुतीन यांच्यासारखे मोदींना मरेपर्यंत पंतप्रधान व्हायचे आहे. विरोधी पक्ष मजबूत असेल तरच हुकूमशाही विरोधात लोकशाहीची ताकद वाढेल. नव्या स्वातंत्र्य लढ्यासाठी देशातील २८ पक्ष एकत्र आले आहेत. या परिसरात कासूला पाणी परिषद झाली होती, त्यावेळी मी विष्णूभाईंना तुम्हाला रस्त्यावर उतरण्याची गरज नाही मी खासदार आहे, असे सांगून जेएसडब्ल्यूकडून लेखी हमी घेऊन ४० गावांना मोफत पाणी मिळवून दिले. चौपदरीकरणाला जमिनी मिळवताना सुद्धा खासदार मीच होतो. त्याचा पाचपट मोबदला नागरिकांना मिळवून दिला आहे; याचे चौपदरीकरणात पाणी लाईन शिफ्टिंग बाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले तेंव्हा जेएसडब्लू कंपनीला खडसावून सांगत ९० कोटी खर्च करायला लावले. आता लाईन पूर्ण झाली की स्वच्छ पाणी येईल अशी मी ग्वाही देतो. मात्र त्यासाठी जनतेने खासदार करावे, अशी भावनिक साद त्यांनी लोकांना यावेळी घातली.

### बकासुराला संपवायचे- अनंत गीते

भाजपचे १०५ आमदार असताना शिवसेना फोडून ४० आमदार पळवले. त्यामुळे १४५ चे बहुमत असताना राष्ट्रवादीचे आमदारसुद्धा पळवले; अजूनही भूक थांबली नाही मग काँग्रेसकडून अशोक चव्हाण यांना नेले ही बकासुराची भूक थांबणार कधी? असा प्रश्न विचारत बकासुराची कथा सविस्तर सांगत रायगड लोकसभेचे उमेदवार अनंत गीते यांनी महाराष्ट्रातील बकासुराचा वारसदार संपवायला रायगडच्या जनतेतून भीम यायला हवा, असे आवाहन मतदारांना केले.

### संविधान वाचविण्यासाठी एकत्र


आता आम्ही एकत्र का आता प्रश्न सर्वांना पडला असेल तर संविधान वाचवण्यासाठी आम्ही एकत्र आहोत. राज्य सरकारवर ९० टक्के कर्मचारी नाराज आहेत. २०२४ ला हे सरकार पुन्हा आले तर ही शेवटची निवडणूक समजा. नॉमिनेशन फॉर्म भरला तरी ईडी लागते. सीआरझेडमध्ये पोयनाड ते अलिबाग ५ हजार बंगले आहेत. त्यांना दंड लागू शकतो; नाहीतर कारवाई करून पाडता येऊ शकते. पण यात ईडी लावायचा संबंध काय? अनिल परब यांना अशीच इडी लागली. त्यामुळे पूर्वी जनता पक्ष जसा सत्तेविरुद्ध सर्वजण एकत्र आले होते, तसेच मोदी सरकार विरोधात इंडिया आघाडीत सर्व पुरोगामी पक्ष एकत्र आले आहेत, असे आ.जयंत पाटील यांनी सांगितले.

### वढावमध्ये इंडिया आघाडीची सभा

सेझसारखे वादळ खारेपाटावर गोंगावत होते, तेव्हा तटकरे कुठे होते? त्यावेळेला खारेपाटातील शेतकरी तटकरेंना आठवले नाही का? प्रा. एन. डी. पाटील, ॲड. दत्ता पाटील, स्व. भाई मोहन पाटील यांनी या खारेपाटातून सेझ हद्दपार केला. परंतु सेझ यावा, म्हणून तटकरेंसारख्या दलालांनी प्रयत्न केला. त्यामुळे खारेपाटात पाय ठेवण्याचा नैतिक अधिकारही तटकरेंना नाही, असा घणाघात आ. जयंत पाटील यांनी केला. वाशी विभागातील वढाव येथे इंडिया आघाडीची प्रचार बैठक शुक्रवारी (दि.१२) रात्री उशिरा संपन्न झाली. या बैठकीमध्ये खारेपाटावर तटकरेंनी कशाप्रकारे अन्याय केला, याचा पाढा शेतकरी कामगार पक्षाचे सरचिटणीस आ. जयंत पाटील यांनी वाचला.

यापुढे आ. जयंत पाटील म्हणाले की, आज तटकरे मतं मागायला येतात, त्यांना विचारा की, आमच्या सातबाऱ्यावरील बोजा कमी करणार का? सातबारे कोरे करून देणार का? देणार असलात तर आम्ही तुम्हाला मत टाकू. पण हा लबाड माणूस असं करणार नाही. हेटवण्याचे धरण हे खारेपाट दुपिकी व्हावे, या उद्देशाने बांधण्यात आले होते. यासाठी मोहन पाटील यांनी स्वतःची २०० एकर जमीन धरणासाठी फक्त २००० रूपये भावाने दिली. जेणेकरुन धरण झाले तर खारेपाट दुपिकी होईल. हेटवण्याचा कालवा आमटेम, नागोठणे, अलिबाग तालुक्यातील कुर्डुस विभागात जाणार होता. परंतु तटकरे जलसंपदा मंत्री असताना एक फुट ही कालवा पुढे वाढला नाही. हे पाप तटकरेंचे आहे. जलसंपदा खात्याच्या या मंत्र्यांनी खारेपाटाचा विचार केला नाही.

पुढे ते म्हणाले मी नारायण नागू यांचा नातू आहे. ज्यांनी तत्कालीन ब्रिटीश शासनाशी लढून शेतकऱ्यांचा प्रदीर्घ संप यशस्वी केला. कुळकायद्याची मुहुर्तमेढ रोवली. तिसऱ्या मुंबईमध्ये खारेपाटातील शेतकरी भागीदार झालाच पाहिजे. आम्ही जमिनी विकणार नाही तर, एमएमआरडी प्रकल्पात भागीदार होऊ. येणारे सरकार हे आपले आहे आणि या सरकारमध्ये केंद्रिय मंत्री अनंत गीते असतील. त्यांना आपल्याला निवडून द्यायचे आहे, असेही शेवटी आ. जयंत पाटील यांनी सांगितले.



# मुरुड किनारी वाळूचा गाळ

- ओहोटीला बोटी किनारी आणणे कठीण
- गाळ साफ करण्याची मागणी

। मुरुड जंजिरा । वार्ताहर ।

मुरुड समुद्रकिनारी २०१६ साली एकदरा खाडीतील गाळ काढण्याचे काम मच्छिमार विभागाने केले, त्यावेळी सात कोटी खर्च करून खाडीतील गाळ काढण्याचे काम तीन महिने सुरु होते. तो गाळ कडून विश्रामधाम किनारी टाकण्यात आला. परंतु, समुद्रातील मुरुडला येण्याचे पात्र मोठे करण्यासाठी एकदरा येथील खडक कापून न काढण्याने केल्याने आज मुरुडच्या मासेमारांना ओहोटीला किनारी येणे कठीण झाले आहे. किनारा वळूनी भरला आहे. पाच तास समुद्रात भरतीचे पाणी भरेपर्यंत ताटकळत उभे राहावे लागते. त्यामुळे मासेमारांची मागणी आहे कि खडक कापून वाळू गाळ साफ करून मुरुडकडे येण्याचा मार्ग मोठा करावा व समुद्रातील वाळू पुन्हा येऊ नये म्हणून ग्रॉइन बंधारा बांधावा अशी मच्छिमारांची मागणी आहे.

> मुरुडच्या कोळी बांधवाना खोल समुद्रात जाताना येताना येण्याचा मार्ग अतिशय अरुंद असल्याने अनेक अडचणीला सामोरे जावे लागते, पूर्वी मासे चांगले मिळत असत परंतु, कोरोंना काळात व हवामान बदलामुळे मासेमारीचा दुष्काळ आहे. त्यात वाळू गाळामुळे बोटी अडकतात आणि कोळी बांधवाचे मोठे नुकसान होते, सर्वप्रथम ग्रॉइन बंधारा बंधने गरजेचे आहे. शासन मासेमारीच्या सम्स्त्यांकडे लक्ष देण्याची गरज आहे. आदीच कर्जात अडकलेला कोळी बांधव उध्वस्त होणयापासून वाचला पाहिजे. –मनोहर बैले, मच्छिमार

## कुमुदिनी चव्हाण यांना उमेदवारी

**पाली/बेणसे :** वंचितचे नेते प्रकाश आंबेडकरांनी रायगड लोकसभा मतदारसंघात मराठा समाजाच्या कुमुदिनी चव्हाण यांना उमेदवारी सोपविली आहे. महायुती आणि इंडिया आघाडीविरोधात वंचित आघाडीने ही उमेदवार दिल्याने तिरंगी लढतीचा सामना रंगणार आहे. वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष बाळासाहेब आंबेडकर यांनी रायगड लोकसभा उमेदवार म्हणून महाडमधील कुमुदिनी चव्हाण यांना जाहीर केली आहे. महाडच्या चवदार तळ्यावर डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि छ. शिवाजी महाराज यांना अभिवादन करून प्रचाराला सुरवात केली. यंदाच्या लोकसभा निवडणुकीत महिलेला दुसऱ्यांदा उमेदवारी वंचितने दिली आहे.

## महायुतीच्या सभेला रिकाम्या खुर्च्या

। अलिबाग । प्रतिनिधी ।

रायगड जिल्ह्यामध्ये लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर प्रचार वेगात सुरु आहे. इंडिया आघाडी विरुध्द महायुती अशी लढत रायगड लोकसभा मतदार संघात पहावयास मिळत आहे. अलिबाग तालुक्यातील हाशिवरे येथील मैदानात महायुतीची प्रचार सभा घेण्यात आली. या सभेला बोटावर मोजण्या इतकेच कार्यकर्ते उपस्थित होते. त्यामुळे महायुतीच्या प्रचाराला खुर्च्या रिकाम्या अशी परिस्थिती निर्माण झाली आहे.

अलिबाग तालुक्यातील हाशिवरे येथील बालवीर मैदानात महायुतीची प्रचार सभा आयोजित केली होती. या सभेला हजारो कार्यकर्ते उपस्थित राहतील असा गाजावाजा करण्यात आला होता. मात्र या प्रचार सभेला अनेक खुर्च्या रिकाम्याच असल्याचे दिसून आले. त्यामुळे सुनील तटकरेंच्या उमेदवारीबाबत मतदारांमध्ये नाराजीचे सूर उमटत असल्याची चर्चा निर्माण झाली आहे.






# मुरूड समुद्रकिनारी पर्यटकांची वर्दळ

**। मुरूड-जंजिरा । वार्ताहर ।**

**मुरूड तालुक्यातील काशीद, मुरूड, नांदगांव सुद्रकिनारी पर्यटन स्थळांवर मार्च महिन्यापासून पर्यटक येत नसल्याने शुकशुकाट होता; परंतु शनिवारी (दि.१३) सकाळपासून पर्यटकांचे पाय पुन्हा या पर्यटन ठिकाणाकडे वळल्याचे दिसून येत आहे. पर्यटकांची वर्दळ वाढती राहणार अशी माहिती काशीद येथील सूर्यकांत जंगम, मुरूड येथील मनोहर बैले, महेंद्र पाटील आदी रेस्ट हाऊस मालकांनी शनिवारी दुपारी बोलताना दिली.**



पर्यटकांच्या वर्दळीने व्यवसायिकांना पुन्हा तेजीचे दिवस येणार असे स्पष्ट दिसून येत आहे. काशीद समुद्रकिनारी सुमारे ३०० ते ४०० वाहने सकाळी दाखल झाल्याची माहिती सूर्यकांत जंगम यांनी दिली. शैक्षणिक परीक्षा आटोपल्याने सुट्ट्या पडल्या आहेत. पर्यटक अनेक ठिकाणाहून जंजिरा जलदुर्ग, काशीद, मुरूड समुद्रकिनारे, नांदगाव येथील प्रसिद्ध सिद्धिविनायक देवस्थान, फणसाड वन्यजीव अभयारण्य, मुरूड दत्तमंदिर देवस्थान, बारशिव येथील रॉक समुद्रकिनाऱ्यावर दाखल होत असल्याचे दिसत आहे. प्रसिद्ध काशीद आणि मुरूड समुद्राकडे शुक्रवारी रात्रीपासून पर्यटक येताना दिसत होते. मुरूड किनाऱ्यावर प्रशस्त पार्किंग जवळ-जवळ पूर्ण होत आले असून वाहनांकरीता सध्या तरी विनामूल्य असल्याने पर्यटकांना काळजी करण्याचे कारण नाही.

# जोगेश्वरी मातेचा पालखी सोहळा

**। नागोठणे । वार्ताहर ।**

नागोठण्याची आराध्य ग्रामदेवता श्री जोगेश्वरी माता व भैरवनाथ महाराजांचा चैत्र पालखी सोहळा बुधवार दि.२४ एप्रिल रोजी साजरा होत आहे. यानिमित्ताने सर्व ग्रामस्थांना व भाविकांना श्री जोगेश्वरी मातेचे दर्शन आपल्या घराजवळ होणार आहे. मात्र, असे असले तरी काही वर्षांपासून पालखी सोहळा पूर्ण होण्यासाठी २ ते ३ दिवस लागत असल्याने सर्वत्र एक चुकीचा संदेश जात असून वेगळी चर्चा होतांना दिसते. त्यामुळेच ग्रामदेवतांची पालखी लवकरात लवकर व नियोजित



वेळेत मंदिरात परतण्यासाठी सर्व ग्रामस्थांनी सहकार्य करण्याचे आवाहन श्री जोगेश्वरी माता मंदिरात गुढीपाडवाच्या निमित्ताने घेण्यात आलेल्या पालखीच्या नियोजनाच्या संदर्भातील बैठकीत श्री जोगेश्वरी माता उत्सव समितीकडून करण्यात आले.

ग्रामदेवतांच्या पालखी सोहळ्यासाठी चाकरमानी, माहेरवासीन तसेच सगेसोयरे, पाहुणे मंडळी मोठ्या संख्येने नागोठण्यात येत असतात. मुंबईकर मंडळी तर फक्त एखाद्या दिवसाची रजा घेऊन आलेले असतात. मात्र, त्यांना पालखीच्या दर्शनासाठी ताटकळत थांबावे लागते व त्यांची गैरसोय होते. काहीवेळा तर पालखी त्यांच्या घरापर्यंत नियोजित वेळेत न आल्याने त्यांना इतरत्र जाऊन पालखीचे दर्शन घ्यावे लागते. त्यामुळेच बैठकीत ग्रामदेवता श्री जोगेश्वरी मातेच्या पालखी सोहळ्याची वेळ कमी करण्यासाठी व पालखी नियोजित वेळेत मंदिरात परतण्यासाठी उपस्थित ग्रामस्थांना अनेक सुचना करण्यात आलेल्या आहेत.

# इंद्रायणी एकविरा पालखी सोहळा

**। उरण । वार्ताहर ।**

उरण तालुक्यातील कळंबुसरे येथील स्वयंभू श्री इंद्रायणी एकविरा देवी यात्रा व पालखी सोहळा सोमवारी (दि.१५) ते मंगळवारी (दि.१६) या दरम्यान श्री इंद्रायणी एकविरा माता ट्रस्ट, कळंबुसरे ग्रामस्थ व मित्र मंडळाकडून मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात येत आहे.

कळंबूसरे येथील स्वयंभू इंद्रायणी एकविरा हे पांडवकालीन स्वयंभू स्थान आहे. प्राचीन काळी पाच पांडव वनवास करत असताना या इंद्रायणी कळंबुसरे डोंगरावर वास्तव्यास होते. तसेच, कार्ल्याची एकविरा देवी पण या ठिकाणी वास्तव्यास होती. एका दिवसात माझे देऊळ या ठिकाणी बांधा मी येथे वास्तव्यास राहीन, असा आदेश एकविरा देवीने पाच पांडवांना दिला. पण एका दिवसात या ठिकाणी देऊळ बांधता आले नाही. देवीने देऊळ व इतर परिसर उध्वस्त केले. देवळाचे काही अवशेष या ठिकाणी पाहायला मिळतात. या नंतर देवी कार्ला येथे स्थायिक झाली. देवीचे आजही येथे वास्तव्य आहे. तसेच, देवी नवसाला



पावणारी, मनातील ईच्छा पूर्ण करणारी म्हणून प्रचलित आहे. येथे चैत्र उत्सव व नवरात्र उत्सव मोठ्या प्रमाणात साजरा केला जातो.


## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसी द्वारे कळविण्यात येते की, माझे अशिल यांनी खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकांकडुन कायमची खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. या मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यार पत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास, आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावर ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल हे खालील परिशिष्टा मध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालका बरोबर आपला खरेदीव्यवहार पुर्ण करतील. मुदतबाहय हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**

**मिळकतीचे वर्णन (अ):-**
**मौजे - मुद्रे खुर्द, ता. कर्जत, जि. रायगड येथील बिनशेती मिळकत**

| मालकाचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं./ प्लॉट नं. | क्षेत्र आर.चौ.मी | आकार रुपये | आकार पैसे |
|---|---|---|---|---|---|
| अनंत दादू मोधळे दर्शना चेतन मिसाळ | २ | ८/अ/१/२/१ | १७.५५.०० | १७५ | ५० |
| | २ | ८/अ/१/२/२ | १.६५.०० | १६ | ५० |
| | २ | ८/अ/१/२/३ | १.००.०० | १० | ०० |
| नितिन नंदकुमार सावंत | २ | ८/क | ४.५०.०० | ९ | ०० |

**मिळकतीचे वर्णन (ब) :-**
**मौजे - मुद्रे खुर्द, ता. कर्जत, जि. रायगड येथील शेत जमिन मिळकत**

| मालकाचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ | आकार रुपये | आकार पैसे |
|---|---|---|---|---|---|
| राहुल शिवाजी आगज | २ | ८/अ/१/१ | ००.१५.०० | १ | ०१ |

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे. सही / -
कार्यालयीन पत्ता :- फ्लॅट नं. ४, ए-विंग, पहिला मजला, गणेश अर्पाटमेंट, कर्जत नगरपालीका कार्यालय शेजारी, ता.कर्जत, जि.रायगड. ४१०२०१.
**ॲड. जयेश संभाजी म्हसे**
दिनांक :- १४/०४/२०२४
मो.नं. ९०२८९८२२७७
ई मेल: adv.jayeshmhase@gmail.com

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे सुरई, ता. अलिबाग, जिल्हा रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत त्या मिळकतीच्या विद्यमान मालक चंद्रकांत बाळकृष्ण म्हात्रे आणि सुरेश बाळकृष्ण म्हात्रे, यांचेकडून कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भुमापन क्रमांक व उपविभाग | एकुण क्षेत्र (हे. आर.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| सुरई ता.अलिबाग | २७२ | वरकस ०-४४-०० पो.ख. ०-०३-०० एकुण ०-४७-०० | ०.७५ |
| | २८५ | वरकस ०-२७-०० पो.ख. ०-०२-०० एकुण ०-२९-०० | ०.४४ |
| | २६६ | वरकस ०-१५-०० पो.ख. ०-०१-०० एकुण ०-१६-०० | ०.२५ |

वर नमुद जमिन मिळकती या नोटीसीचा विषय आहे.

सदरहू वर्णन केलेली मिळकत निर्वेध, बोजा रहीत असल्याची हमी सदर मिळकतीचे विद्यमान मालकांनी आमचे अशिलांस दिलेली आहे. तथापी सदर मिळकतीत अन्य कुणाचाही गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, साठेकरार, मृत्युपत्र, अन्नवस्त्र, जप्ती, लिज, कर्जाचा बोजा, जामिनकी, कुळहक्क, कब्जा, वारसाहक्क, मालकी, एम.ओ.यू. करार, ताबेकब्जा वहीवाट रस्ता वहीवाट, कोर्टकचेरी वगैरे संबंधी कसल्याही प्रकारचे हक्क अगर हितसंबंध अगर तक्रार/हरकती असल्यास त्यांनी त्यांची हरकत ही नोटीस प्रसिध्द झालेपासून १५ दिवसांचे मुदतीत लेखी स्वरूपात, प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार यांचेकडे सादर कराव्यात. तशी लेखी हरकत वा तक्रार दिलेल्या मुदतीत आली नाही, तर सदर मिळकतीवर विद्यमान मालकाशिवाय अन्य कोणाचाही कसलाही हक्क, हितसंबंध अधिकार नाही. वा असल्यास तो त्यांनी स्वेच्छेने सोडुन दिला आहे असे समजुन, गुहीत धरून सदरचा विक्री व्यवहार खरेदीखत करून पूर्ण केला जाईल व या मुदतीनंतर आलेल्या हरकती व तक्रारी आमचे अशिलांवर बंधनकारक रहाणार नाहीत याची सर्वानी नोंद घ्यावी.

अलिबाग
दि. १३/०४/२०२४
मोबा. ९९२२७९८५२८
**ॲड. राहुल रमेश नाईक**
मु.चिंचपा गल्ली, नागाव
ता. अलिबाग, जि. रायगड

## जाहीर नोटिस

सर्व जनतेस कळवण्यास येते की, आमचे आशिलांनी **मौजे येलवणे, ता.अलिबाग,** येथील खालील वर्णनाची जमीन मिळकत, मिळकतीचे विद्यमान मालक **दत्तात्रेय गजानन वार्डे** वगैरे यांचेकडून विकत घेण्याचे ठरवून तसा विक्रीचा व्यवहार आमचे अशिल व विद्यमान मालक यांचेमध्ये ठरलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे येलवणे, ता.अलिबाग, भूमापन व उपविभाग नं. १८/५, जिरायत ०-१२-१०, पो.ख.०-००-८०, आकार रु.३.६२/- ही मिळकत हा या नोटिसचा विषय आहे.**

तरी वर वर्णन केलेली जमिन मिळकत विद्यमान मालकांच्या ताबे कब्जाची, वहिवाटीची, निर्वेध, बोजाविरहित, विकण्यायोग्य असल्याची हमी विद्यमान मालकांनी आमचे अशिलांस दिली आहे. तरी वरील मिळकतीं संबंधी कोणाचाही कसल्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, मालकी, गहाण, दान, बक्षिस, विक्रीचा करार, दावा, लिज, अन्नवस्त्र, हवाला, पोटगी, चार्ज, ताबा, वहिवाट, भाडेपट्टा, वाटणी, बोजा असल्यास अथवा त्यांची या व्यवहारास हरकत असल्यास आपली हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासहीत नोटीस प्रसिध्द झालेपासून ७ दिवसांचे कालावधीत लेखी नोंदवावी. या कालावधीत कोणतीही हरकत न आल्यास आमचे अशिल सदरहू मिळकतीचा व्यवहार पूर्ण करतील व मागाहून आलेली कोणतीही हरकत आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

अलिबाग
दि.१४.०४.२०२४
**ॲड. मिलिंद चव्हाण**
८,आनंद अपार्टमेंट, श्रीबाग-३, अलिबाग

## PNP EDUCATION SOCIETY

**Required Teaching Staff**

PNP Education Society is one of the leading Education society working since 2001. For our various English medium schools (affiliated to CBSE and State Board) located at Nagaon, Sambari(Kurdus), Veshvi, Vavoshi and Khalapur we require Principals and teachers.

**Subjects -** Mathematics, Science, English, Social Studies, Hindi, Marathi, Computer Science, Art & Craft, French, Drawing and Physical Education Teachers
**Qualification -** As per the norms.

**Pay scale - For the post of the Principals Rs. 50,000/- to 1,00,000/-**
**For the post of the teachers Rs. 15,000/- to 30,000/-**

**Note :** Pay scale depends on the qualification, experience, teaching skills and previous CTC. / Fluency in English is a must.

**For more details please contact**
Rajashree Patil : 9892150116 / Shruti Sutar : 9673371587
**Please mail your CV on**
shrutisutar154@gmail.com
pnp.rajashree@gmail.com / pnpedusoc@gmail.com
**Dates :** 18th April 2024
**Timing :** 11 a.m. to 3 p.m.
**Venue :** PNP Ganga Vishnu jakhotia memorial English medium School khalapur.. near by panchayat samiti. Tal -Khalapur, Dist- Raigad.


# पनवेलमधून महिला बेपत्ता

**पनवेल :** राहत्या घरातून कोणास काही एक न सांगता एक महिला कोठेतरी निघून गेल्याने ती हरवल्याची तक्रार कळंबोली पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आली आहे. मंगल सोपान पवार (वय ४० वर्षे रा. कळंबोली एल आय जी २, से. १) असे या महिलेचे नाव असून तिचा रंग गोरा, उंची ४. ५ फुट, बांधा सडपातळ नाक जाड छोटे, डोळे बारीक, केस काळे पांढरे असून तिने आखुड नेसणीस जांभळ्या रंगाचा ब्लाउज व जाभळ्या रंगाची साडी घातली आहे. तसेच तिच्या पायात गुलाबी रंगाची प्लास्टीकची चप्पल आणि हातात हिरव्या रंगाच्या काचेच्या बांगड्या व पितळी बांगड्या असून पायात नकली चेन आहे. या महिलेबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्यांनी कळंबोली पोलीस ठाणे किंवा पोलीस उपनिरीक्षक एस. एस. नवले यांच्याशी संपर्क साधावा.

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

-मुख्य संपादक


## जाहिर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की आमचे अशिल श्री. भगवान यशवंत शिरोशे यांच्या मालकीचा मौजे वरसोली, ता. अलिबाग स.नं. २२१/२ब प्लॉट नं.७ या मिळकतीमध्ये बांधण्यात आलेल्या वरदवंदत को.ऑप.हौ. सोसायटी मधील पहिल्या मजल्यावरील फ्लॅट नं.८ क्षेत्र ५१५ चौ. फुट हा आहे. सदर फ्लॅट मिळकत ही आमच्या अशिल यांनी दिनांक २८/११/२००२ रोजी दस्त क्रं २०२३/२००२ या दस्ताने लिहून देणार १. श्रीकृष्ण विश्वनाथ घाग्रेंकर, २. कृष्णा बळवंत शिर्के यांच्याकडून खरेदीखताने विकत घेतली आहे.

परंतु दिनांक २१/०१/१९९७ रोजीचा दुय्यम निबंधक अलिबाग यांचेकडील दस्त क्रं १७६/१९९७ कडे नोंदविण्यात आलेला आहे लिहून घेणार १. श्रीकृष्ण विश्वनाथ घाग्रेंकर लिहून देणार मोहीनीराज कृपा कन्स्ट्रक्शन कंपनी पार्टनरशीप फर्मचे पार्टनर १ श्री भगवान पंढरीनाथ खाडे २ राजेंद्र गंगाराम भोसले यांच्यामधे झालेले मुळ खरेदीखत हे आमच्या अशिलांकडून घेण्याचे राहून गेले अथवा ते त्यांच्याकडून हरविले आहे. या मिळकती संदर्भातील खरेदीखताचा मूळ दस्त हा या नोटीसचा विषय आहे.

मात्र तरी देखील वर नमुद केलेल्या मिळकतीवर खरेदीखताच्या मुळ दस्ताच्या आधारे कोणाचाही विक्री गहाण दान बोजा बक्षिस लिज लीएन या अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास अथवा सदरचा मुळ दस्त त्यांच्या ताब्यात असल्यास त्यांनी त्यांची हरकत ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन सात दिवसांच्या आत खाली दिलेल्या पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यांसहित लेखी स्वरूपात कळवावी.

अलिबाग
दि. १४/०४/२०२४
सही/-
**ॲड.सौ.गौरी गिरीश म्हात्रे**
डी२ हिराबाग सोसायटी,
जिल्हा न्यायालयाच्या विरूध्द
अलिबाग रायगड
मो नं. ९२७१७७५२७७

## जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, खाली नमुद केलेल्या मालकांची नावे या कॉलममध्ये नमूद केलेले शेत जमिन मिळकतीचे मालकांकडून त्यांचे नावासमोरील कॉलममध्ये नमूद केलेली त्यांचे मालकीची खुदद्, ताबा, कबजा, वहिवाटीतील मिळकत आमचे अशिल यांनी खरेदी घेणेबाबत व्यवहार ठरवीला आहे. सदर मिळकत निर्वेध असल्याचा हवाला जमीन मालकांनी आमचे अशिलांस दिला आहे, त्या जमीन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे:-

**मौजे: तांबडीवाडी, ता. रोहे, जि. रायगड येथील शेतजमिन**
**मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे:-**

| मालकाचे नाव | गट नं. | क्षेत्र : हे.आर. | आकार रू. पै. |
|---|---|---|---|
| १. श्री. अनिल मधुसुदन तेंडुलकर | १८८(३५९) | १३-५०-०० | ६=०६ |
| २. श्री. विलास मधुसुदन तेंडुलकर | | पैकी क्षेत्र ०६-००-०० | |
| ३. श्री. अलका मधुसुदन तेंडुलकर | | हे. आर. | |
| ४. श्री. प्रियवंदा प्रकाश तेंडुलकर | | | |
| ५. श्री. प्रणव प्रकाश तेंडुलकर | | | |
| ६. श्री. प्रीती भूषण वाळींबे | | | |

तरी सदरचे मिळकतींवर कोणाचा कोणताही दान, गहाण, बक्षीस, फरोक्त, साठेकरार, लिज, लिएन, चार्ज, ॲटॅचमेंट, अन्न, वस्त्र, निवारा, भाडेहक्क, ताबा, कबजा, वचनचिठठी, दावा, दरखास्त, जप्ती, मॉर्टगेज, संपादन, रिझर्व्हेशन, रिक्वीझेशन अगर अन्य प्रकारचा बोजा, हक्क, हितसंबंध असल्यास ही जाहिर नोटीस प्रसिध्द झालेपासून सात (७) दिवसांचे आत खालील सही करणारे ॲडव्होकेट यांजकडे लेखी रजिस्टर पोस्टाने हरकत प्रथमदर्शनी पुराव्यासह दाखल कराव्यात, तशा प्रकारच्या हरकती दाखल न केल्या गेल्यास सदरची वरील मिळकत पूर्णपणे निर्वेध असल्याचे गृहीत धरून आमचे अशिल सदर खरेदी व्यवहार पुरा करतील व मागाहून येणाऱ्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत. हे कळावे,

दि. १३/०४/२०२४
**एस् एन्.सानप**
बी.कॉम.एल.एल.बी.ॲडव्होकेट
सावरकर रोड, ता.रोहा,
जि. रायगड, फोन नं. ९६६५५५२७५२

## शुध्दीपत्रक

तमाम जनतेस या शुद्धीपत्रकाव्दारे कळविण्यात येते की, दैनिक कृषीवल या वर्तमानपत्राच्या तारीख ११/०४/२०२४ रोजीच्या अंकाच्या पान क्रमांक ७ वर मौजे उसरोली, ता. मुरूड, जि. रायगड संदर्भात जाहीर नोटीस प्रसिध्द करण्यात आली होती. सदर जाहीर नोटीसीच्या मिळकतीचे वर्णनाच्या तक्यात मिळकतीचे वर्णनामध्ये भूमापन क्रमांक ५४२ ऐवजी टंकलेखनाच्या चुकीमुळे 'भुमापन क्रमांक ४४२' असा नमूद झाला आहे. तरी सदर मिळकतीचा 'भुमापन क्रमांक ४४२' ऐवजी 'भूमापन क्रमांक' ५४२ वाचण्यात यावा.
जाहीर नोटीसीतील उर्वरीत मजकुर जसाच्या सा वाचण्यात यावा.

अलिबाग,
दिनांक :- १३/०४/२०२४
**ॲड. दिपक विश्वनाथ नागे**
सदनिका क्र. १, तळ मजला,
लक्ष्मी को. ऑप. हौ. सोसायटी, कामत आळी,
मु.पो. ता. अलिबाग, जि. रायगड.

## महाराष्ट्र शिक्षण संस्था पेण,
ता.पेण जि.रायगड

**वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस**
**सर्व सभासदांसाठी**

महाराष्ट्र शिक्षण संस्था पेण, या संस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा बुधवार दि.१/०५/२०२४ रोजी सकाळी ठिक ९.०० वाजता महाराष्ट्र शिक्षण संस्था पेण च्या श्री.पी.डी.पाटील सभागृहात घेण्याचे ठरविले आहे.

तरी सर्व सन्माननीय सभासदांनी सभेस उपस्थित रहावे ही विनंती.

**सभेपुढील कामे :-**
१. मागील सभेचे इतिवृत्त वाचून मंजूर करणे.
२.संस्थचे सन २०२३-२४ या वर्षाच्या जमाखर्चास मंजूरी देणे.
३.संस्थेच्या सन २०२४-२५ चे अंदाजपत्रक वाचून मंजूरी करणे.
४.सन २०२३-२४ या शैक्षणिक वर्षामध्ये झालेल्या कार्यकारणी मंडळाच्या मिटींगला मान्यता देणेबाबत..
५.संस्थेची नवीन घटना दि.१८/०३/२०१६ पासून मंजूर होवून अस्तित्वात आली आहे. त्यामध्ये संस्थेचे सभासद कमी करणे विषयी पोटनियम-६ क मधील नियमाप्रमाणे आज पर्यंत कमी झालेल्या सभासदांचा व नवीन झालेल्या सभासदांचा आढावा घेवून सभासद कायम करणे बाबत विचार विनिमय करणे...
६.प्रशालेच्या प्रांगणांत मार्बल बसविणे बाबत चर्चा करणे.
७.मा.अध्यक्ष साहेबांच्या परवानगीने आयत्यावेळी येणाऱ्या कामांचा विचार करणे.

आपला विश्वासू
**मा.अध्यक्ष**
**महाराष्ट्र शिक्षण संस्था पेण**

**विशेष सूचना:**
गणसंख्ये अभावी सभा तहकूब झाल्यास पुढील सभा त्याच ठिकाणी त्याच विषयावर विचार विनिमय करण्याकरीता अर्ध्या तासांत पुन्हा घेंण्यात येईल.

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टा मध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालका कडुन कायमचे खरेदीखताद्वारे आमचे आशिलांनी विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. या मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यार पत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास, आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावर ही नोटीस प्रसिध्द झाल्या पासून ०७ (सात) दिवसांत कळवावे. मुदती मध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालकाबरोबर आपला खरेदी व्यवहार पुर्ण करतील. मुदत बाहय हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**
**मौजे किकवी, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमीन मिळकत**

| मालकाचे नांव | सर्व्हे नं. | प्लॉट नं. | क्षेत्र चौ.मी | आकार रु.-पै. |
|---|---|---|---|---|
| जयंतीलाल चुनीलाल दिक्षीत प्रोटोकिम इंडस्ट्रिज | १४६ | ३६ | ७२०.०० | ७२-०० |

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे. सही / -
कार्यालयीन पत्ता :- मु.पो.कशेळे, कर्जत-मुरबाड रोड, सरकारी दवाखान्या समोर, ता.कर्जत, जि.रायगड. ४१०२०१
**ॲड. भुपेश तानाजी पेमारे**
दिनांक:- १४/०४/२०२४
मो.नं.९१५८२७७७२८

दिनांक :१४/०४/२०२४

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की,

ज्याअर्थि श्री. काळुराम बाळकृष्ण बोर्ले यांच्या मालकी वहीवाटीची व प्रत्यक्ष ताबे कब्जा वहीवाटीतील मौजे नागशेत ता. सुधागड, जि. रायगड येथिल पुढीलप्रमाणे वर्णनाची जमिन मिळकत त्यांचेकडुन आमचे अशिलांनी मोबदल्यापोटी कायम खरेदी करण्याचे ठरविले आहे.

**-: जमिन मिळकतीचे वर्णन**
**मौजे- नागशेत, ता. सुधागड, जि.- रायगड येथिल**

| गट नं. | एकुण हे.आर.चौ.मी. | आकार रु. पै. |
|---|---|---|
| ६० | ०-३८.२० | ०.२१ |

त्याअर्थी सदर मिळकतीमध्ये अगर तिच्या कोणत्याही भागावर कुणाही तिऱ्हाईतांचे गहाण-दान, बक्षिस, फरोक्त, करारनामा, एम.ओ.यू, हुकुमनामा, मनाई आदेश, जप्ती, वहिवाट, हिस्सा अगर त्याप्रकारचे कोणतेही हक्क हितसंबंध निगडीत असल्यास अगर सदर व्यवहारांस कुणाचीही हरकत असल्यास अशा हितसंबंधीत व्यक्ती, संस्था इत्यादींनी त्यांची लेखी हरकत जरूर त्या कागदोपत्री पुराव्यानिशी सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून दहा (१०) दिवसांचे आत आमच्या खालीलप्रमाणेच्या पत्त्यावरील कार्यालयात सादर कराव्यात.

विहित मुदतीमध्ये कुणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकतीवरील श्री. काळुराम बाळकृष्ण बोर्ले यांचे मालकी हक्क हितसंबंध निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजुन आमचे अशिल सदरचा व्यवहार पुर्ण करतील व मुदतीनंतर आलेल्या हरकती ग्राहय धरल्या जाणार नाहीत. हे सर्व जाहीर व्हावे.

पाली
दिनांक : १४/०४/२०२४.
**श्री. नरेश गोविंद शिंदे,** ॲडव्होकेट
पत्ता :- मु. पो. पाली भोईआळी,
ता. सुधागड, जि. रायगड ४१०२०५
मोबाईल नं. ०८४८३९९४३४३.

## क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- श्री सिद्धीविनायक ज्योतिष सर्व समस्यांचे शीघ्र निवारण, नोकरी धंदा, गृहक्लेश, व्यापारवृद्धी, प्रेमसमस्या, लग्नामधील अडचण फोन नं. ९९६०४५६९८६/८८०६४७९१७३, अलिबाग
- बोअरवेल-विहिरीसाठी मशीनद्वारे अचूक भूजल संशोधन-९२२६७६६१२९
- शुभमुहूर्त विवाह मंडळ अलिबाग शाखेत सर्वजातीय वधूवरांची नावनोंदणी ४८ शाखा, वेबसाईट नोंदणीसाठी -९२२६७६६१२९
- भेरसे येथे ३० गुंठे जागा विकणे आहे व वावे नाक्यावर जागा विकणे आहे. तसेच मुरूड बीचपासून १२ कि.मी. अंतरावर रोडटच १ एकर जागा विकणे आहे. मो. ८२०८२९०६६२/९३७०१२६२५५
- पुरूष रिसेप्शनिस्ट पाहिजे स्विमींग पूल तासिका/मासिक तत्वावर उपलब्ध. ८३९०४२४२२२/९२७२३८३४७६
- उजाला विवाह मंडळ, मुंबई उजाला ज्योतिष क्लासेस, रायगड Mob No.: 9324987050
- अलिबागमधील सोसायटीमध्ये वॉचमन कम स्वीपर पाहिजे. संपर्क-८७८८०२१५१०
- अलिबाग एस.टी.स्टँडजवळ गाळा भाड्याने देणे आहे. संपर्क- ९४२२६९४२०३/९३२२४८५८९८
- ड्रायव्हर पाहिजे संपर्क : ९३२२४८५८९८/९४२२६९४२०३
- अलिबागमध्ये ब्लॉक व दुकानाचे गाळे भाड्याने देणे आहे. संपर्क : मोबाईल ९८२२०३१०१७/९०२८५६५९१७
- पर्यटन व्यवसायासाठी कॉटेज/बंगला/घर-वाडी किंवा इतर मालमत्ता पाहिजे. ७०६६१३८३६८

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

## ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन
१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.
मोबाईल : ९८६०६५८५६५




# सातारा पुन्हा इतिहास घडवेल

**। सातारा । प्रतिनिधी ।**

**माझ्यासमोर कोण उमेदवार आहे, तो मी पाहिलेला नाही. माझी त्यांच्याशी स्पर्धा नसून माझी लढाई तत्त्वाची आणि महाराष्ट्राच्या स्वाभिमानासाठी आहे. जिल्ह्यातील जनतेला बदल हवा असून, या जनतेच्या ताकदीवर ही निवडणूक मी लढत आहे. खासदार शरद पवार यांच्यासह महाविकास आघाडीतील उद्धव ठाकरे, राहुल गांधी यांच्या माध्यमातून सातारा जिल्हा पुन्हा एकदा इतिहास घडवेल आणि शरद पवार यांचा जिल्हा पुन्हा अबाधित राहील, असा विश्वास आ. शशिकांत शिंदे यांनी व्यक्त केला.**

## शशिकांत शिंदेंना विश्वास

सातारा लोकसभेची उमेदवारी जाहीर झाल्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे उमेदवार शशिकांत शिंदे यांचे जिल्ह्यात आगमन झाले. यावेळी त्यांचे जंगी स्वागत करण्यात आले. यावेळी त्यांनी पत्रकारांशी संवाद साधला. शशिकांत शिंदे म्हणाले, शरद पवार यांचा आदेश आल्यानंतर मी तत्काळ निवडणुकीत उतरलो आहे. जिल्ह्यातील जनतेत मोठ्या प्रमाणात उठाव असून, जनतेच्या ताकदीवर ही निवडणूक लढत आहे. त्याचा परिणाम पाहायला मिळेल.शाहू, फुले, आंबेडकर, तसेच यशवंतराव चव्हाण यांच्या विचारांच्या या जिल्ह्याने पुरोगामी विचाराला प्राधान्य दिले आहे. या वेळी मला उमेदवारीची संधी मिळाली आहे. जिल्ह्यात प्रवेश करताना तरुण, सामान्य शेतकरी आणि सातारकरांचा उत्साह ओसंडून वाहत आहे. लोकांच्या मनात जे काही आहे, त्यातून हा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला आहे.



## मराठा समाजाची साथ मिळणार

**मराठा आरक्षणाचे वादळ तुमच्या पथ्यावर पडणार का? या प्रश्नावर शशिकांत शिंदे म्हणाले, मी मनोज जरांगे पाटील यांच्या मोर्चावेळी मुंबईत केलेली मदत ही स्वकर्तव्य म्हणून केलेली आहे. यातून कोणतीही अपेक्षा नव्हती. केवळ मराठा समाजाचाच असंतोष नाही, तर धनगर समाजाचा प्रश्न आहे. ओबीसींचा मुद्दा आहे. सध्याच्या सरकारने त्यांना न्याय दिला नाही. उलट वाद निर्माण करण्याचा प्रयत्न केला आहे. हे आता सर्वांना कळाले आहे. या सर्वांना एकत्र घेऊन मी पुढे जाणार आहे.**

# सुप्रिया, सुनेत्रा १८ एप्रिलला दाखल करणार अर्ज

**। बारामती । प्रतिनिधी ।**

लोकसभा निवडणूकीसाठी विद्यमान खासदार महाविकास आघाडीच्या उमेदवार सुप्रिया सुळे व महायुतीच्या उमेदवार सुनेत्रा पवार १८ एप्रिल रोजी पुण्यात आपला उमेदवारी अर्ज दाखल करणार आहेत.



बारामती लोकसभा मतदारसंघासाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याची अंतिम मुदत १९ एप्रिल आहे. बारामतीतील प्रमुख लढत सुप्रिया सुळे विरुध्द सुनेत्रा पवार अशीच होईल हे स्पष्ट झाले आहे. अजून इतर कोण उमेदवार अर्ज दाखल करतात या वरही मतांची किती विभागणी होणार हेही ठरणार आहे.

बारामती मतदारसंघातील सर्वच सहा विधानसभा मतदारसंघात उन्हाचा तडाखा जाणवत आहे. प्रचंड उन्हात कार्यकर्त्यांना प्रचार करावा लागत आहे. त्यामुळे दुपारी प्रचार देखील थंडावत आहे. पूर्ण निवडणूकच भर उन्हात होत असल्याने सर्वच राजकीय पक्षांपुढे या कडक उन्हाचे आव्हान उभे ठाकले आहे.

दरम्यान, १८ एप्रिल रोजी दोन्ही बाजूंकडून मोठे शक्तीप्रदर्शन करत उमेदवारी अर्ज दाखल केले जाणार आहेत. मुख्यमंत्री व दोन्ही उपमुख्यमंत्री या प्रसंगी उपस्थित राहणार असून तिन्ही उमेदवारांच्या प्रचारार्थ अर्ज दाखल केल्यानंतर पुण्यात जाहीर सभाही होणार आहे. बारामती मतदारसंघात आता हळुहळू निवडणूकीचे वातावरण तयार होऊ लागले आहे. प्रचारसभा, कोपरासभा, प्रत्यक्ष गाठीभेटी, संवाद, कार्यक्रमांना उपस्थिती, पत्रकवाटप, रॅली, पदयात्रा या माध्यमातून उमेदवार व त्यांच्या समर्थकांनी प्रचाराला वेग देण्याचा प्रयत्न सुरु केला आहे.

# स्टार प्रचारकांतून शिंदे, पवारांना वगळले

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

भाजपाने मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांना आपल्या स्टार प्रचारकांच्या यादीतून वगळले आहे. राज्याच्या मुख्य निवडणूक आयुक्तांच्या पत्रानंतर हे पाऊल उचलण्यात आले आहे. स्टार प्रचारकांच्या यादीत केवळ स्वतःच्या पक्षातल्याच नेत्यांचा समावेश असावा, असे निवडणूक आयोगाने सांगितले आहे. निवडणूक आयुक्तांनी सर्व जिल्हाधिकारी आणि जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यांना पत्र पाठविले आहे. लोकप्रतिनिधी कायदा, १९५० नुसार स्टार प्रचारक हे त्याच पक्षाचे असले पाहीजेत, असा नियम आहे. त्याप्रमाणे कार्यवाही करण्याचे आदेश निवडणूक आयुक्तांनी दिले आहेत.



भाजपाने २६ मार्च रोजी ४० स्टार प्रचारकांची यादी निवडणूक आयोगाकडे सादर केली होती. यामध्ये २० प्रचारक महाराष्ट्राच्या बाहेरील तर २० प्रचारक राज्यातील होते. यामध्ये पहिले नाव मुख्यमंत्री शिंदे व उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे होते. दरम्यान, भाजपाने आता नवी यादी निवडणूक आयोगाकडे सादर केली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील स्टार प्रचारक आता देशभर भाजपाचा प्रचार करतील.

# उमेदवार ठरायच्या आधीच प्रचारात मुसंडी

**। सावंतवाडी । प्रतिनिधी ।**

लोकसभेच्या रत्नागिरी-सिंधुदुर्ग मतदारसंघात महायुतीच्या उमेदवारीसाठी शिवसेना आणि भाजपमधील रस्सीखेच सुरूच असली, तरी केंद्रीय मंत्री नारायण राणे यांची उमेदवारी जवळपास निश्‍चित मानली जात आहे. शिवसेनेतून उमेदवारीसाठी चर्चेत असलेले किरण सामंत गेले दोन दिवस मुंबईत ठाण मांडून असून त्यांच्याकडूनही उमेदवारीसाठी प्रयत्न सुरू आहेत. मात्र, राणे उमेदवार आहेत, असे गृहीत धरून भाजपने प्रचारात मुसंडी मारली आहे.



उमेदवारीचा तिढा अद्याप सुटलेला नाही. यात कमळ चिन्हावर उमेदवार उभा करण्यावर भाजप सुरुवातीपासून ठाम आहे. दोन्ही जिल्ह्यांमध्ये प्रभाव टाकू शकणारा उमेदवार द्यावा लागणार असल्याने राणे यांचे नाव पुढे आले.

शिवसेनेने त्यांच्यातर्फे किरण सामंत यांचे नाव चर्चेत आले. महायुतीतील या चढाओढीत उमेदवारी कोणाला द्यायची, यावरून तिढा अद्याप कायम आहे.शिवसेनेचे सामंत दोन दिवस मुंबईत आहेत. त्यांनी दोन्ही पक्षांतील वरिष्ठांच्या गाठीभेटी घेतल्याचे समजते. यात शिवसेनेने पुन्हा एकदा उमेदवारीसाठी पुन्हा आग्रह धरला आहे.

# महायुतीमधील जागाचे गुढ संपेना

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

राज्यातील मतदानाचा पहिला टप्पा आता सहा दिवसांवर आला आहे. मतदान असणाऱ्या विदर्भातील पाच जागांवर जोरदार प्रचार सुरु झाला आहे. राज्यस्तरीय आणि राष्ट्रीय नेत्यांच्या प्रचार सभा होत आहेत. परंतु, महायुतीत अजूनही सर्व अलबेल नाही. महायुतीमधील आठ जागांवर भाजप, शिवसेना आणि राष्ट्रवादी या तिन्ही पक्षांचे मतैक्य झाले नाही. मुंबईतील दक्षिण मुंबईसह तीन जागा आणि ठाणे, पालघर, रत्नागिरी-सिंधुदुर्ग, नाशिक आणि छत्रपती संभाजीनगर अशा ८ जागांवर अजूनही महायुतीमध्ये मतैक्य झाले नाही. आठ जागांवर उमेदवार ठरेल तेव्हा ठरेल, पण प्रचारात आघाडी घेता यावी, यासाठी महायुतीने संयुक्त प्रचाराची रणनीती आखली आहे. उमेदवार जाहीर न झाल्याने प्रचारावरही मर्यादा येण्याची चिंता महायुतीमधील तिन्ही पक्षातील नेत्यांना आहे. भाजप आणि शिवसेनेच्या राज्यातील पक्षनेतृत्वाने त्यावर तोडगा काढताना आपआपल्या पक्षाच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांना मतदारसंघात प्रचार करण्याचे आदेश दिले आहेत.



एकीकडे महाविकास आघाडीचा उमेदवार जोरात प्रचार करत असताना दुसरीकडे महायुतीचा उमेदवार मात्र अद्याप जाहीर न झाल्याने कार्यकर्ते संभ्रमात आहेत.

# खासदार महाडिक यांच्याविरोधात तक्रार

**। कोल्हापूर । प्रतिनिधी ।**



महाविकास आघाडी, इंडिया आघाडीने खासदार प्रा. संजय मंडलिक आणि खासदार धनंजय महाडिक यांच्याविरोधात शुक्रवारी (दि.१२) निवडणूक अधिकाऱ्यांच्याकडे तक्रार केली आहे. आघाडी काँग्रेसचे उमेदवार श्रीमंत शाहू छत्रपती यांच्या विरोधात केलेल्या अवमानकारक वक्तव्याबद्दल महाविकास आघाडीचे शिवसेनेचे उमेदवार प्रा. संजय मंडलिक यांच्यावर फौजदारी गुन्हा दाखल करावा, अशी मागणी भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे शहर सचिव रघुनाथ विष्णू कांबळे यांनी कोल्हापूर लोकसभा मतदारसंघाचे निवडणूक अधिकाऱ्यांकडे केली आहे.

तर, संजय मंडलिकांना मताधिक्य देणाऱ्या तालुक्याला पाच कोटी विकास निधी देण्याची घोषणा करणाऱ्या राज्यसभेचे खासदार धनंजय महाडिक यांच्याविरोधात शिवसेना शहर प्रमुख सुनील मोदी यांनी मतदारांना अमिष दाखविल्याबाबत तक्रार दाखल केली आहे. ऐन निवडणूकीच्या काळात त्यांनी शांतता भंग घडविण्याच्या उद्देशाने खोटी व चुकीचे विधाने केली आहेत. शाहू छत्रपतींच्याबद्दल जनतेच्या मनात चांगली भावना असताना त्यांची प्रतिमा मलिन करण्याची कृती खासदार मंडलिकांनी केली असल्याने त्यांच्यावर त्वरीत फौजदारी गुन्हा दाखल कराव अशी मागणी केली आहे.

# साप्ताहिक राशिभविष्य दि. १४ ते २० एप्रिल २०२४

**ज्योतिषी : मिलिंद पाटील, सारळ-अलिबाग**
**मोबा.९४०४७९१७९८**

## उत्तम सामंजस्य राहील

**मेष :** या राशीधारकांना आपले ग्रहमान पाहता तुम्ही आपली आर्थिकस्थिती अधिक उत्तम बनवू शकतात. या महिन्यात घरातील लोकांमध्ये उत्तम सामंजस्य राहील. या सोबतच जीवनसाथी सोबत मिळून तुम्ही काही नवीन व्यवसाय या काळात सुरु करू शकतात. या राशीतील काही विद्यार्थी या सप्ताहात जास्त उस्फुर्त होऊ शकतात म्हणजे की, विद्यार्थ्यांना लक्षात येऊ शकते की, त्यांनी आपल्या आयुष्यातील किती किमती वेळ वाया घालवला आहे म्हणून, या राशीतील विद्यार्थ्यांद्वारे उत्तम अभ्यास केला जाईल. प्रेम आणि वैवाहिक जीवन या सप्ताहात दोन्ही क्षेत्रात उत्तम फळ प्राप्त होतील तथापि, तुम्हाला प्रेमाच्या नात्यामध्ये कुठल्या ही प्रकारचा गैरसमज करणे टाळले पाहिजे अथवा नाते खराब होऊ शकते. आरोग्याला घेऊन या काळात तुम्हाला थोडे सतर्क राहण्याची आवश्यकता आहे. तुम्हाला डोळ्याची तपासणी केली पाहिजे आणि नियमित सुर्योदयाच्या वेळी श्री सरस्वती मंत्राचा जप करा. **महिलांना:** कौटुंबिक वातावरण बिघडू देऊ नका. सार्वजनिक ठिकाणी आपले मतप्रदर्शन करण्याचे टाळावे. खिसा पाकीट भरलेले राहील. **शुभ दिनांक :**१७,२०.

## कमाईत वृध्दी होण्याची शक्यता

**वृषभ :** या सप्ताहातील ग्रहमान पाहता सहनशीलता आणि धैर्य तुमचे गुण आहे आपल्या ह्याच गुणांमुळे तुम्ही जीवनाच्या काही क्षेत्रामध्ये प्रगती करू शकतात. या साप्ताहात तुम्हाला आपल्या याच गुणांना घेऊन पुढे जावे लागेल. या कालावधीत तुम्हाला कार्य क्षेत्रात चांगले फळ मिळतील कारण, तुम्ही शारीरिक दृष्ट्या बरेच फीट राहाल. कठीण परिश्रम आणि इमानदारीने तुम्ही या सप्ताहात कार्यक्षेत्रात आपली नवीन ओळख बनवू शकतात. तुमच्या कामाला पाहून तुमच्या बॉसद्वारे तुमच्या कमाईमध्ये वाढ केली जाऊ शकते तसेच, व्यावसायिकांचा व्यवसाय ही चांगला चालेल. तुम्हाला आर्थिक जीवनात चांगल्या फळांची प्राप्ती या काळात मिळेल. जर तुम्ही आपल्या घरातील काही मौल्यवान वस्तू विकण्याचा प्लॅन बनवत असाल आणि ते आतापर्यंत विकल्या गेल्या नसेल तर, या काळात डील मिळू शकते. **महिलांना:** प्रयत्न केल्यास पुष्कळशा गोष्टी साध्य करू शकाल. कौटुंबिक जीवनात तुम्ही नेहमी सुख शांतीमध्ये राहण्याची कामना करतात. तुमची ही कामना ह्या वेळेत पूर्ण होऊ शकते. **शुभ दिनांक :** १६,१८

## रागावर नियंत्रण ठेवा

**मिथुन :** याराशीसाठी आपले ग्रहमान पाहता आपल्या आवडीच्या गोष्टी करण्यात आनंद घेता येईल. दूरच्या आप्तेष्टांशी वार्तालाप होण्याची शक्यता आहे विरोधकांच्या कारवायांवर नजर ठेवा. आपल्या घरात एखादी किमती वस्तूची खरेदी होणार आहे. मोठ्या व्यक्तिनचे रागाचे बोलणे मनावर घेऊ नका. आपल्या रागावर नियंत्रण ठेवून शांतता बाळगल्यास आपण सर्व बाबतीत अग्रेसर राहू शकाल. जर तुम्ही शिक्षण घेण्याची इच्छा ठेवतात आणि शिक्षणाच्या क्षेत्रात यश प्राप्त करण्याची इच्छा आहे तर ते पूर्ण होईल. पण तुम्हाला आपल्या मित्रांपासून थोडी दुरी ठेवली पाहिजे. तुमच्या प्रेम जीवनाची गोष्ट केली तर, या महिन्यात तुम्ही आपल्या जीवनसाथी किंवा लवमेट सोबत पैश्याने जोडलेल्या कुठल्या मुद्याला घेऊन भांडू शकतात. तुमचा भाऊ किंवा बहिणींमुळे तुमच्या प्रेम संबंधात या महिन्यात समस्या येऊ शकतात. **महिलांना :** प्रकृतीस्वास्थ्य जपा. या राशीतील जातकांना या महिन्यात डोळे किंवा कान संबंधित समस्या होऊ शकते. कुठल्या ही प्रकारच्या आरोग्य समस्यांना दूर करण्यासाठी तुम्हाला डॉक्टरांकडे जाणे योग्य असेल स्वतःच घरगुती इलाज करणे टाळा. **शुभ दिनांक :** १५,१७

## कलागुणांना प्रोत्साहन मिळेल

**कर्क :** या राशीधारकास आपल्याकडे दृढइच्छा शक्ती नसली तरी आपल्या भावनेच्या बळावर तुम्ही या साप्ताहात जीवनात सकारात्मक परिवर्तन आणू शकतात. करिअरच्या क्षेत्रात ज्या चांगल्या बदलाची तुम्ही कामना करतात ते बदल या साप्ताहात येऊ शकतात. या बदलाचे कारण ही तुम्हीच आहे कारण, तुम्ही आपल्या व्यवहारामध्ये सकारात्मक परिवर्तन केले आहे आणि आपल्या वाणीमध्ये गोडवा आणला आहे म्हणून, या सप्ताहात तुम्हाला याचा फायदा कार्यक्षेत्रात मिळू शकतो. या राशीतील जातकांच्या कमाईमध्ये या महिन्यात वृद्धी होईल या कारणाने घरातील बरेच खर्च तुम्ही सहजरित्या पूर्ण करू शकाल. जर तुम्ही कुणावर प्रेम करतात तर, या वेळी आपल्या घरातील प्रेम संबंधाच्या बाबतीत माहिती देऊ शकतात तथापि, तुमच्या भाऊ बहिणींमध्ये कुणाला तुमच्या प्रेमसंबंधांनी चिंता होऊ शकते. या राशीतील विद्यार्थ्यांसाठी या महिन्यात शिक्षणाच्या क्षेत्रात सामान्य फळांची प्राप्ती होईल. **महिलांना :** त्यांच्या अंगभूत कलागुणांना प्रोत्साहन मिळेल. आपण प्रत्येक बाबतीत नम्रतेचे धोरण स्वीकारल्यास हाती घेतलेल्या कार्यात यश मिळू शकेल. **शुभ दिनांक :** १४,१५

## कामाची प्रशंसा होईल

**सिंह :** या राशीसाठी या सप्ताहात आपल्या कामाची प्रशंसा केली जाईल. कामात असताना तब्बेतिकडे दुर्लक्ष करू नका. आपण आपली अस्मिता शुल्लक कारणाने दुखावली जाणार नाही याची दक्षता घेतल्यास आपल्या मनाप्रमाणे पुष्कळशा गोष्टी साध्य होणे शक्य आहे. तुमची बुद्धिमत्ता या काळात उत्तम राहील. बुद्धी कौशल्याने तुम्हाला सन्मान प्राप्त होईल. या साप्ताहात तुम्ही आपल्या प्रियकर/ प्रियसीसोबत कुटुंबातील सदस्यांना न सांगता विवाह करण्याचा प्लॅन बनवू शकतात तथापि, योग्य सल्ला हा असेल हे ही करणे तुमच्यासाठी योग्य नाही तुम्हाला विवाहाच्या आधी आपल्या घरचांसोबत चर्चा केली पाहिजे आणि त्यांना हे सांगायला हवे. या सप्ताहात तोंडाच्या संबंधित काही समस्यांचा सामना लागू शकतो. जर तुम्ही गुटका, तंबाखू जश्या पदार्थांचे सेवन करत असाल तर, तुम्हाला या समस्यांचा सामना करावा लागू शकतो. अश्या गोष्टींपासून दूर राहणेच तुमच्यासाठी उत्तम असेल. **महिलांना :** तब्बेत ठीक वाटत नसेल तर प्रवास टाळा, मित्र, मैत्रिणी खुशखबर देतील. वैवाहिक जोडीदाराशी जुळवून घ्या. आपल्या ध्येयासाठी प्रयत्नशील राहा. कलाक्षेत्राला प्रोत्साहन मिळेल. नको त्या जबाबदाऱ्या स्वीकारू नका. **शुभ दिनांक :** १५,१९

## कृतीवर अधिक भर द्या

**कन्या :** या राशीसाठी या सप्ताहात सुरुवातीला तुमच्या आईचे आरोग्य या सप्ताहात खूप चांगले राहील यामुळे तुम्ही बऱ्याच चिंतांनी मुक्त व्हाल. यामुळे तुम्ही ज्यांच्यावर प्रेम करतात त्यांच्या आईकडून या महिन्यात तुम्हाला समर्थन मिळू शकते म्हणजे काही गोष्टींना घेऊन ते तुमच्या जोडीदारापेक्षा तुमच्यावर विश्वास दाखवू शकते. या महिन्यात तुम्हाला छातीदुखीची समस्या होऊ शकते. या राशीतील जातकांना या महिन्यात डोळे किंवा कान संबंधित समस्या होऊ शकते. खासकरून, छातीच्या उजव्याबाजूस अधिक दुखापत होईल. तसेच, कंबरेच्या डाव्या बाजूला ही दुखणे असू शकते. नियमित एक ठरलेल्या वेळी महामृत्युंजय मंत्राचा१०८ वेळा जप करा. नोकरदारांना दिलासा मिळेल. कलाक्षेत्राला चांगले प्रोत्साहन मिळेल. **महिलांना :** सासुरवाडीकडून काही शुभसंकेत मिळतील. आपली माहेरची माणसे घरी येतील त्यांची ऊठबस करावी लागेल, घरातील अनावश्यक खर्चाला आळा घाला त्यामुळे मनावर ताण येणार नाही आपण बोलण्यावर नियंत्रण ठेवून कृतीवर भर दिल्यास पुष्कळशा गोष्टी साध्य करता येतील. **शुभ दिनांक :** १७,१८

## विचारात अडकू नका

**तुळ :** या राशीसाठी या सप्ताहाचे ग्रहमान पाहता प्रत्येक व्यक्तीला वाटते की, त्यांच्या करिअरचा ग्राफ लागोपाठवर जात रहावा. तुमच्या कमाईमध्ये वृद्धी होईल आणि तुमची नोकरी व्यवस्थित चालत राहिल. तसेच या राशीतील जे जातक बेरोजगार आहे त्यांना ही चांगली नोकरी मिळवण्याचे स्वप्न पाहत असतील तर, आनंदित व्हा या आठवड्यात तुम्हाला आपल्या मनासारखी नोकरी मिळू शकते. तसेच तुमच्या कमाईमध्ये वृद्धी होऊ शकते. कमाईमध्ये वृद्धी होण्याने या महिन्यात तुमचे बरेच थांबलेले काम पूर्ण होतील. आर्थिक पक्षाची मजबुती तुम्हाला मानसिक संतृष्टी प्रदान करेल. कौटुंबिक जीवनात ही या सप्ताहात तुम्हाला सुखद अनुभवाची प्राप्ती होईल. कुटुंबातील लोकांसोबत बसून तुम्ही खूप गप्पा करू शकतात. जर तुम्ही शाळा किंवा कॉलेजमध्ये शिक्षण घेतात तर, ह्या महिन्यात शाळा कॉलेजच्या शिक्षणासोबत काही एक्स्ट्रा ॲक्टिव्हिटी शिकण्यात रुची घेऊ शकतात. कुणी अल्प अवधीचे काम तुम्ही सुरु करू शकतात. **महिलांना :** सप्ताहाच्या मध्यावर धनलाभ संभवतो. नको त्या विचारात अडकू नका. **शुभदिनांक :** १६,१९

## कुटुंबाचे सहयोग मिळेल

**वृश्चिक :** या राशीसाठी या सप्ताहाचे ग्रहमान पाहता या राशीतील लोकांचे चतुर्थ, पंचम आणि दशमभाव सक्रिय अवस्थेत राहतील. करिअरच्या दृष्टीने पहिले असता या राशीतील लोकांचा महिना शुभ राहील. निजी आयुष्यात तुम्ही बरेच आनंदी राहाल म्हणून, तुम्ही कार्य क्षेत्रात ही चांगले प्रदर्शन करू शकाल. तुम्ही प्रत्येक कार्यात आपले सर्वश्रेष्ठ देण्याचा या सप्ताहात प्रयत्न कराल. जर तुम्ही नोकरी पेशा करत असाल तर, या सप्ताहात त्यांना चांगल्या सॅलरीवर कुठल्या नवीन नोकरीचा प्रस्ताव मिळू शकतो. या राशीतील काही जातकांच्या आईच्या कमाईमध्ये वृद्धी होण्याने घरातील आर्थिक स्थिती सुधारू शकते. तुमच्या आई वडिलांच्या आरोग्यात सकारात्मक बदल होण्याची पूर्ण शक्यता आहे. या सप्ताहात तुम्ही घरचांच्या सल्ल्याने नवीन गाडी किंवा बाईक खरेदी करू शकतात. या राशीतील विद्यार्थी विद्यार्थिनींना शिक्षणाच्या क्षेत्रात या सप्ताहात आपल्या कुटुंबाचे पूर्ण सहयोग मिळेल. **महिलांना :** या महिन्यात आरोग्यास विशेष काही त्रास होण्याची शक्यता नसली तरी पहिल्या दहा दिवसात पित्त प्रकोप, पोटात जळजळ, पायांच्या स्नायूंचे दुखणे होण्याची शक्यता आहे. **शुभ दिनांक :** १४,१५

## आरोग्याची काळजी घ्या

**धनु :** या राशीतील जातक दृढ इच्छा शक्तीचे मालक असतात. या सप्ताहाचे ग्रहमान पाहता जर तुमच्या घरात कुणाची तब्बेत बरी नसेल तर, तुम्हाला त्यांच्यावर आपला पैसा खर्च करावा लागू शकतो. जर तुमचे मोठे भाऊ बहीण आहे तर, या दिवसांत तुमच्याकडून आर्थिक मदत माघू शकतात. कौटुंबिक जीवनात तुम्हाला आपल्या विवेकाचा वापर करून स्थिती सुधारावी लागेल. या साप्ताहात मुलांसोबत कुठल्या गोष्टीला घेऊन वाद होऊ शकतात. कुटुंबासोबत वेळ व्यतीत करण्यासाठी ऑफिसमधून लवकर काम संपवून घरी लवकर पोहचण्याचा प्रयत्न या महिन्यात तुम्ही करू शकतात. या राशीतील विद्यार्थ्यांना या दिवसांत शिक्षणाच्या क्षेत्रात मनासारख्या फळांची प्राप्त होऊ शकते. या राशीतील जातकाचे प्रेम जीवन या महिन्यात प्रतिकूल राहू शकते. **महिलांना:** तुमच्या आरोग्य जीवनाची गोष्ट केली तर या साप्ताहात तुम्हाला पोट आणि खांदादुखी समस्या होऊ शकतात. आपले आरोग्य उत्तम ठेवण्यासाठी तुम्हाला या दिवसांत कमीत कमी प्रवास केला पाहिजे. नियमित सुर्योदयाच्या वेळी श्री लक्ष्मी नारायण आरतीचा जप करा. **शुभदिनांक :** १८,१९

## गैरसमज दूर करा

**मकर :** हा साप्ताह मकरराशीसाठी या सप्ताहाचे ग्रहमान पाहता या साप्ताहात तुम्हाला आपल्या पाठ्यक्रमाच्या पुस्तकांसोबत आपल्या सामान्य ज्ञानाला वाढण्यासाठी बातम्या आणि वृत्तपत्र वाचणे गरजेचे राहील. उद्योग धंद्यात तुम्हाला आपल्या व्यवहारात सकारात्मक परिवर्तन आणावे लागतील. या राशीतील जातकांसाठी हा सप्ताह सामान्य राहण्याची अपेक्षा आहे. जर गत काळातील झालेल्या वेळेत तुम्हाला आपल्या कार्य क्षेत्रात काही समस्या येत असेल तर, या सप्ताहात त्या दूर होऊ शकतात. या कालावधीत तुम्हाला कार्यक्षेत्रात काही नवीन असाइनमेंट मिळू शकतात ज्यामध्ये तुम्हाला आपल्या प्रतिभेला पाहण्याची संधी मिळेल या असाइनमेंट वर तुम्ही पूर्ण मेहनतीने काम कराल. तसेच, या राशीतील काही जातक या सप्ताहात चांगल्या सॅलरीवर काही नवीन नोकरी प्राप्त करू शकतात. या कालावधीत तुम्ही आपल्या मुलांच्या शिक्षणावर पैसा खर्च करू शकतात. **महिलांना :** आपल्यासाठी प्रेम एक सुंदर अनुभव आहे परंतु, जेव्हा याच प्रेमाची जागा संशय किंवा गैरसमज घेते त्यावेळी गैरसमजांमुळे भांडणाचीस्थिती निर्माण होऊ शकते. थोड समंजपणे वागणे आपल्या हिताचे ठरेल. घरात गोडधोड होईल **शुभ दिनांक :** १६,१७

## आव्हानांना सामोरे जावे लागेल

**कुंभ :** या राशीसाठी या सप्ताहाचे ग्रहमान पाहता आपलयाला या आठवड्यात बऱ्याच क्षेत्रात आव्हानांचा सामना करावा लागू शकतो जसे की, या साप्ताहात या राशीतील जातकांना करिअरच्या क्षेत्रात थोडे सांभाळून चालावे लागेल. कारण, तुमच्या कार्यक्षेत्रात वेगळ्या प्रकारच्या समस्या येऊ शकतात. आपल्या टीममधील जवळच्या लोकांसोबत वाद होऊ शकतात. कौटुंबिक जीवनात या राशीतील लोकांना चांगले फळ मिळण्याची पूर्ण अपेक्षा आहे. या राशीतील लोक आपल्या घरचांसोबत या सप्ताहात सामंजस्य बसवण्याचा पूर्ण प्रयत्न करतील. या राशीतील विद्यार्थ्यांसाठी ही दिवस थोडे विपरीत जाऊ शकतात. या महिन्यात तुमचे अभ्यासात मन लागण्यात समस्या येऊ शकतात. शिक्षकांच्या सहयोगाने मार्गदर्शनाने तुम्ही बऱ्याच विषयात येणाऱ्या समस्या दूर करू शकाल. **महिलांना:** या महिन्यात तुम्हाला किडनी आणि पोट संबंधित समस्या होऊ शकतात म्हणून, तुम्हाला आपल्या खाण्या-पिण्याची आणि आपल्या दिनचर्येवर या महिन्यात विशेष काळजी घ्यावी लागेल. नियमित सुर्योदयाच्या वेळी ॐ हनुमते नमः चा जप करा. **शुभ दिनांक :** १४,१५

## आर्थिक बाजू ठीक राहील

**मीन :** या राशीसाठी या सप्ताहाचे ग्रहमान तुमच्यासाठी लाभदायक असणार आहे. वडील, वडिलधारी मंडळी, भाऊ-बहिण आणि वरिष्ठांच्या सहयोगाने सुरूवात आपल्यासाठी चांगली असेल. आपल्याला यश मिळेल, पण आपण अस्वस्थ झाल्यास किंवा दुर्लक्ष केल्यास तर आपण आपली प्रतिष्ठा गमावून बसण्याची शक्यता आहे. आपल्याला कोणत्याही सरकारी कामाच्या प्रती सावधान राहण्याची आवश्यकता आहे. कारण नंतर आपला खर्च वाढणार आहे. नंतर ही परिस्थिती बदलेल. आपण शेअर्स,म्युचुअल फंड, सोने, चांदी या संपत्ती गुंतवणूक करण्यासाठी सक्षम असाल. पण यात गुंतवणूक करण्यापूर्वी एकदा आवश्यक तज्ञ व्यक्तीचा सल्ला घ्या. अचानक आपल्याला प्रलंबित फायदे मिळू शकतात. व्यावसायिक जीवनात काही अनिश्‍चिततेचा सामना करावा लागण्याची शक्यता आहे. दरम्यान, आपण सुखी वैवैहिक जीवनाचा आनंद घ्याल. **महिलांना:** आप्तेष्टांच्या संपर्कात राहता येईल व त्यांची ख्याली-खुशाली घेता येईल. आर्थिक बाजू ठीक राहील. कौटुंबिक वातावरण बिघडू देऊ नका. सार्वजनिक ठिकाणी आपले मतप्रदर्शन करण्याचे टाळावे. **शुभ दिनांक :** १९,२०.

# पुरातन संस्कृती, परंपरा, चालीरीतीतून प्राणवायूचे 'संवर्धन'

**"आज माणसे कित्येक रोगांना बळी पडत आहेत. याच युगात असेही काही अदृश्य आजार निमाण होत आहत की, ज्यावर वैज्ञानिकांचे संशोधन चालू आहे. परंतु अशा अदृश्य रोगांची, आजारांची संख्या अधिकाधिक वाढतव आहे. आता तर असे आजार निर्माण होत आहेत किंवा फैलावत आहेत की, ज्यामुळे आपण आश्चर्यचकितच व्हावे, आजच्या दिखाऊ जगात तुळशीकडे दुर्लक्ष करणे, तिची उपेक्षा करणे हे धार्मिक अनुष्ठानांची किंवा कार्यांची उपेक्षा करण्यासारखे आहे. परमेश्वरनिर्मित या निसगाने आपल्याला हजारो, लाखो, करोखे थोडक्यात मोजता येणार नाहीत असे इतके नजराणे बहाल केले आहेत. तुळशीचे आपल्या आयुष्यात काय महत्त्व आहे, तिच्यापासून आपल्याला कोणकोणते फायदे होऊ शकतांत? हे आपण समजू शकालो असतो तर, अनेक प्रकारच्या औषधांमध्ये वापरण्यात येणारी तुळस ही परमेश्वराच्या वरदानाबरोबरच पवित्र आणि पूजनीय मानली गेली आहे. तुळस ही खूप मोठी रोगजंतुनाशक औषधी आहे. यातही प्रकार आहेत त्यातील मकृष्ण तुळशीचा धार्मिक कार्यात वापर करण्यात येतो, तर हिचे दुसरे रूप म्हणजे मकाळी तुळसफजी रोगांचा प्रसार झाला असता उपयोगात आणली जाते."**

**कोकणस्पंदन**
**धनंजय शेट्ये**

'काही संस्कृती, परंपरा, चालीरीती अनुभवताना 'हे' असंच का? 'ते' तसंच का? असे कुतूहलाचे प्रश्न मनात निर्माण व्हायचे. पण त्या प्रश्नांची उत्तरे मिळत नसायची मग मन उकल घ्यायचं. मन शांत बसू देत नसे. प्रत्येक गोष्टीमागची कारणमीमांसा शोधून घेणे गरजेचे वाटत असे. पण विचारावे तर विचारावे कोणाला? बरं कोणाला विचारलं तर थातूरमातूर उत्तरं मिळायची त्यातूनही कधी समाधान होत नसे. अगदी साधे साधे प्रश्न मनात काहूर उठवायचे. म्हणजे बघा 'तुळशीवृंदावन' घरासमोर का लावले जाते? त्यात तुळशीचे झाड का लावले जाते? तुळशीवृंदावनाला पाणी देऊन प्रभात समयी स्त्रिया का प्रदक्षिणा घालतात? सकाळीच अंगण सडासंमर्जन करून शेणानेच का सारवले जाते? घरासमोर रांगोळी का घातली जाते? असे नानाविध प्रश्न! या गोष्टी मागचे कोडे कधी बालपणी सुटलेच नाही.पण चौथी इयत्तेत असताना वर्गात परिसराच्या तासाला बाईनी एकदा तुळस हे झाडच फक्त दिवसरात्र ऑक्सिजन देते, प्राणवायू देते याचे ज्ञान करून दिले होते. बाकीची सर्व झाडे रात्री कार्बनडायऑक्साइड उत्सर्जन करतात व दिवसा प्राणवायू म्हणजे ऑक्सिजन देतात. त्यामुळे तुळशीच्या झाडांचे विशेष महत्त्व व झाडांचे महत्त्व मला त्या काळात समजू लागले. प्राणवायू आपल्या जीवितासाठी किती महत्त्वाचा आहे? झाडांचे महत्त्व आपल्या जीवनात काय आहे?'झाडे लावा झाडे जगवा' याचाही अर्थ बालमनावर त्या काळात रुजू होत होता. तसंच एकदा परिसराच्या तासाला शाळेत बहुगुणी तुळशीचे महत्त्व पटवून देताना तुळशी वृंदावनाचे महत्त्व वर्णन केले होते. अंगणात भरपूर प्रमाणात तुळशीची झाडे लावलेली असावीत दिवसरात्र भरपूर प्रमाणात प्राणवायू उपलब्ध होऊ शकतो. वातावरणातील प्राणवायूचे संतुलन राखण्यासाठी झाडांचे अस्तित्व खूप महत्त्वाचे आहे. वृक्ष हाच खरा आपला सखासोबती आहे. झाडे औषधे देतात फळे देतात, फुले देतात, जळाऊ इंधन देतात घरासाठी लागणारे लाकूड सामान देतात, फर्निचरसाठी लाकूड सामान देतात, वातावरण संतुलित करतात त्यामुळे वृक्ष संवर्धन,जतन करणे काळाची गरज आहे. संत तुकाराम महाराजांनी सुद्धा 'वृक्षवल्ली आम्हा सोयरे' म्हणून झाडाचे महत्व स्पष्ट केलेच आहे.

तत्कालीन समाज हा अंधश्रद्धाळू, अशिक्षित होता. त्या समाजाला ऑक्सिजनचे, प्राणवायूचे महत्त्व समजावून सांगणे खूपच कठीण गोष्ट होती. मग अशा अशिक्षित, अंधश्रद्धाळू समाजाला झाडाचे महत्व प्राणवायूचे महत्त्व कसे समजवायचे? ही भयंकर जटील समस्या होती. तत्कालीन समाज हा फक्त 'देव आणि भूत' यांनाच घाबरत होता. या गोष्टीचा गैरफायदा घेऊन ढोंगी साधू लोक साध्याभोळ्या माणसांना भानामती, कर्मकांडे यांच्या नावाखाली लुबाडत असत. तुळशीवृंदावनाला प्रदक्षिणा घालण्यामागचा उद्देश असा होता की त्या काळात 'चूल आणि मूल' सांभाळत संसाराचा गाडा सांभाळणारी स्त्री ही घराबाहेर बहुतांश पडत नसे. उंबरठा ओलांडून बाहेर जायचं असेल तर डोक्यावर पदर घेऊन जावं लागत असे. त्यामुळे ऑक्सिजन अशा स्त्रियांना पुरेसा मिळत नसे. मग तिला शुद्ध ऑक्सिजन मिळण्यासाठी सकाळी पुरुष वर्ग झोपलेला असताना तुळशी वृंदावतांना प्रदक्षिणा घालण्याची प्रथा अस्तित्वात आली असावी. त्यानिमित्ताने सकाळच्या प्रहरी भरपूर शुद्ध प्राणवायु स्त्रियांना मिळत असे.

तीच गोष्ट भूत या संकल्पनेतून सज्जन माणसांनी सामान्यांच्या मनावर बिंबवली रात्रीच्या वेळी वडाच्या, पिंपळाच्या, चिंचेच्या झाडाखाली झोपू नये ऑक्सिजन, प्राणवायू मिळणार नाही ऑक्सिजन अभावी गुदमरून मृत्यूही ओढवू शकतो.अर्थात हे सर्व समजवायचे कसे? मग कधी देवाचा तर कधी भुताचा धाक दाखवून वैज्ञानिक दृष्टिकोन मनामनात रुजवावा लागला. वडाच्या, पिंपळाच्या, चिंचेच्या झाडाखाली झोपू नये. रात्री भुताटकी येऊन आपल्या गळा दाबून आपल्याला ठार मारेल. तत्कालीन समाज अशिक्षित, अंधश्रद्धाळू असल्याने भूतांच्या भीतीचा धाकातून वैज्ञानिक दृष्टिकोन जागृत करु लागला. लोक भुताला घाबरायचे त्यामुळे या गोष्टीवर पटकन विश्वास ठेवू लागले काही ठिकाणच्या वनराई, देवाची वनराई म्हणून देवाला घाबरून काही लोक वृक्षतोड करीत नाहीत अर्थात काही का असेना पर्यावरणाचे रक्षण होते संवर्धन होते 'हे ही नसे थोडके.' **



**डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या यंदाच्या जयंतीला उंबऱ्यावर असणाऱ्या लोकसभा निवडणुकांची पार्श्वभूमी आहे. या घटनाकाराने देशाला शाश्वत मूल्ये दिली. यंत्रणेला एक खंबीर चौकट दिली. या चौकटीत कोणत्याही भेदाला स्थान नव्हते. मात्र आज जगात आदर्श समजली जाणारी ही चौकटच बदलण्याचे प्रयत्न सुरू आहेत. म्हणूनच त्यांना जोरदार प्रतिबंध करण्यासाठी बाबासाहेबांच्या विचारांचे अवलोकन व्हायला हवे.**

# विचारांचे अवलोकन

**मोहोर**

**प्रा. अर्जुन डांगळे**



व्यक्ती जाते पण विचार उरतो, असे नेहमीच म्हटले जाते. काही नावांबाबत ही बाब प्रकर्षाने जाणवते. त्यातील एक म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकर. या महामानवाची जयंती साजरी करत असताना, विशेषत: उंबऱ्यावर येऊन ठेपलेल्या लोकसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर केवळ सादरीकरणाकडे नव्हे तर त्यांच्या विचारांमधून प्रेरणा घेण्याकडे लक्ष ठेवणे गरजेचे आहे. बाबासाहेबांना देशाच्या घटनेचे शिल्पकार म्हणून आपण ओळखतो. मात्र, आज त्याच घटनेतील मूल्ये विसरली जात असण्याच्या काळात या दिवसाचे महत्त्व वेगळ्या अर्थाने वाढते, असेही आपण म्हणू शकतो. बाबासाहेबांनी नेहमीच लोकशाहीच्या सामाजिकीकरणाचा विचार मांडला. लोकशाही हा जीवनमार्ग असल्याचे त्यांचे मत होते. परिस्थितीमुळे प्रवाहापासून दूर राहिलेल्यांना वा जाणीवपूर्वक दूर ठेवले गेलेल्यांना मुख्य प्रवाहात आणण्याच्या विचारांना त्यांनी नेहमीच अग्रक्रम दिला. आजच्या काळात त्यांच्या या विचारांचे स्मरणही व्हायला हवे.

आज आपण लोकशाहीचा संकोच होताना बघत आहोत. विशिष्ट वर्गाची मक्तेदारी वाढताना दिसत आहे. या पार्श्वभूमीवर बाबासाहेबांच्या 'एक माणूस, एक मूल्य' या तत्वावर निर्माण केलेल्या भारतीय संविधानाचा विचार करणेही महत्त्वाचे आहे. त्यांचे विचार एका माणसासाठी, जातीसाठी वा समूहासाठी नव्हे, तर भारतातील सगळ्या 'नाही रे' वर्गाला मूळ प्रवाहात सहभागी करुन घेण्याच्या बाजूचे होते. मानवी स्वातंत्र्याच्या जाहीरनाम्याचा तो एक भाग होता, असेही आपण म्हणू शकतो. वर्ण, भेद, जात, लिंग अशा कोणत्याही बाबींवरुन कोणावर अन्याय होता कामा नये, असे ते म्हणायचे. म्हणूनच आपण त्यांना कोणा एका समुहाचे नेते नव्हे तर मानवमुक्तीच्या लढ्याचे नेते म्हणून ओळखतो. मात्र, आता देशाचे हे संविधानच बदलण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे की काय, असे वाटते.

'क्रांती आणि प्रतिक्रांती' या नावाने लिहिलेला बाबासाहेबांचा एक निबंध प्रसिद्ध आहे. त्यात त्यांनी लिहिले होते की, समाजातील खालचे, नाकारले गेलेले वर्ग काही काळानंतर प्रगती करुन उन्नती साधू पाहतो तेव्हा सत्ता हाती असणारा प्रस्थापित वर्ग आपले हितसंबंध धोक्यात आल्यामुळे खालच्या वर्गाला दाबण्याचा प्रयत्न करत असतो. यातूनच प्रतिक्रांतीची सुरूवात होते. आज त्यांनी सांगितलेली प्रतिक्रांतीची परिस्थिती आली आहे की काय, असेही वाटून जाते. बाबासाहेबांनी कधीच कोणत्या विचारसरणीला विरोध केला नाही. महात्मा गांधींनीही कोणत्याही एका धर्मावर आधारित देश नको, असे मत व्यक्त करताना मला हिंदू भारत नको आहे, असे म्हटले होते. पाकिस्तान धर्माच्या आधारे निर्माण झाला तसे इथे होऊ नये, हे मत समजून घेण्याजोगे आहे.

या द्रष्ट्या लोकांच्या विचारधारेमुळेच भारतातील लोकशाही व्यवस्था जगभर नावाजली गेली. अगदी शेजारच्या देशांमध्येही लोकशाही यंत्रणेचे धिंडवडे उडालेले दिसत असताना आपल्याकडे मात्र या मूल्यांच्या आधारे उभी राहिलेली समाजव्यवस्था दिवसेंदिवस बलशाली होत गेली. देशात स्थैर्य असेल तरच प्रगती होते. सगळीकडे अराजक असेल, जातीपातींमध्ये तंटे-भांडणे असतील तर कोणत्याही देशाची प्रगती होणे शक्य नाही. त्यामुळे सर्व प्रकारचे स्थैर्य प्रस्थापित होण्यासाठी बाबासाहेबांचे एक वाक्य नेहमी लक्षात ठेवायला हवे. 'मी प्रथम भारतीय आहे आणि अंतिमत:ही भारतीयच आहे' अशी भावना व्यक्त करणारा त्यांचा विचार नव्या पिढीपर्यंत पोहोचवणे गरजेचे आहे. ही जाणीव वाढवणे हीच बाबासाहेबांना जयंतीदिनानिमित्त वाहिलेली योग्य भावनांजली ठरेल. अर्थातच ही जाणीव संविधानामुळे निर्माण होते. म्हणूनच संविधानाने सांगितलेल्या मूल्यांच्या जतनाकडे आणि पालनाकडे लक्ष देणे ही सध्याच्या काळाची गरज आहे. प्रत्येक भारतीयाने प्रशासनात, सार्वजनिक जीवनात याचे भान राखले गरजेचे आहे, पण संविधानाचे जतन ही सरकारचीही जबाबदारी आहे. असे असले तरी, देशातील सध्याची स्थिती फारशी आश्वासक नाही. जातीपातींमधील वाढती तेढ चिंता वाढवत आहे. खरे

तर या लोकशाही देशात धर्म हा राजकारणाचा अविभाज्य भाग असणे योग्य नसते. परंतु, आज धर्म तसेच जातींच्या राजकारणावर भर दिला जात आहे. मग देशात सर्वधर्मसमभावाची शिकवण कशी रूजवली जाणार, हा खरा प्रश्न आहे. त्या दृष्टीने सर्व स्तरातील लोकांनी विचार करण्याची आवश्यकता आहे किंवा हा वैचारिक घुसळणीचा भाग ठरायला हवा. या देशातील साऱ्यांना शिक्षण मिळाले पाहिजे. त्यापासून कोणी वंचित राहता कामा नये, असा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा आग्रह होता. परंतु, आजची स्थिती विचारात घेतली तर शिक्षण वरचेवर महाग होत चालले आहे. त्यामुळे ते विशिष्ट वर्गापुरतेच मर्यादित राहते की काय, अशी शंका वाटत आहे.

सरकारी शाळांबाबत अनास्था आणि दुसरीकडे खासगी शाळांना प्रोत्साहन यामुळे सरकारी शाळा अडचणीत आल्या आहेत. खासगी शाळांमधील शिक्षण सामान्य तसेच गरिबांच्या आवाक्यातील राहिलेले नाही. अशा स्थितीमध्ये शाळाबाह्य मुलांची संख्या वाढणे साहजिक आहे. बेरोजगारीचा प्रश्नही ऐरणीवर आहे. म्हणजे सामान्य, गरिबांच्या मुलांना शिक्षण घेणे कठीण होत असताना दुसरीकडे शिकलेल्यांच्या हाताला काम नाही. त्यामुळे आता केवळ उच्च शिक्षणावर भर देऊन भागणार नाही तर या उच्च शिक्षितांच्या रोजगाराची व्यवस्था होणेही गरजेचे आहे. आज जग वेगाने बदलत आहे. ग्लोबलायझेशनचा जमाना आहे. यात आधुनिक विचार, आधुनिक दृष्टीकोन या बाबी गरजेच्या ठरत आहेत. असे असताना प्रत्यक्षात जातीधर्मावर भर देत देश जुन्या विचारांकडे झुकत चालल्याचे पहायला मिळणे क्लेषकारक आहे.

सध्या अनेक ज्वलंत प्रश्नांकडे अक्षम्य दुर्लक्ष होताना दिसत आहे. बेरोजगारी, शेतकऱ्यांचे प्रश्न, महिलांची सुरक्षा आदी विषय काळजी वाढवत असले तरी त्याकडे सोयिस्कर डोळेझाक करुन जातीय, धार्मिक अस्मिता अधिक घट्ट करण्याचा प्रयत्न होताना दिसत आहे. एखाद्या गोष्टीचा फायदा आपल्या जातीबांधवांना वा धर्मबांधवांनाच व्हावा असा आग्रह धरला जात असून त्यासाठी प्रयत्न केले जात आहेत. यातून निर्माण होणारी आर्थिक विषमता चिंताजनक आहे. ही आर्थिक विषमता देशाच्या विकासातही अडसर ठरते, हे लक्षात घ्यायला हवे. देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर 'आता आपण विसंगत जगात प्रवेश करत आहोत' असे डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले होते. त्याचे प्रत्यंतर आताही पहायला मिळत आहे.

देशातील गरिबी, दारिद्र्य कमी करण्याचे आव्हान आजही कायम आहे. किंबहुना, दारिद्र्यरेषेखाली राहणाऱ्यांची संख्या कमी होण्याऐवजी वाढत आहे. अशा परिस्थितीत दारिद्र्य निर्मूलनाचा कालबध्द कार्यक्रम हाती घेणे आणि त्याची काटेकोर अंमलबजावणी गरजेची आहे. दारिद्र्य, बेकारी, गरिबी याविरूध्दचा लढा हे सुध्दा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या चळवळीचे मुख्य सूत्र होते. इंदिरा गांधी यांनी पंतप्रधानपदी असताना बँकांचे राष्ट्रीयीकरण केले आणि देशातील सावकारी रद्द केली. याचा सामान्य जनतेला फायदा झाला. तसा काही कार्यक्रम आता राबवला जाण्याची आवश्यकता आहे. आर्थिक विकासाचे सर्व नियम घटनेत असावेत, असा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा आग्रह होता. परंतु तो त्यावेळी मान्य करण्यात आला नाही. त्यामुळे आजही देशाच्या आर्थिक विकासाचे धोरण कसे आहे, ते कोणाच्या बाजूने आहे, असे प्रश्न पडल्याशिवाय राहत नाहीत. त्याच बरोबर सर्वंकष आर्थिक विकासाचे धोरण प्रत्यक्षात कधी येणार आणि त्याचे अपेक्षित परिणाम कधी दिसून येणार, हाही विचारात घेण्याजोगा भाग आहे. **

## कविता

### बाबासाहबजी विश्व का महानतारा!

ओ तारा नही होता,
तो ये नारा नही होता।।
ओ जीता नही होता,
तो ओ प्यारा नही होता ।।
उसने सारा जीवन अपना
दिया है गरीबों को,
ओ पैदा नही होता,
तो ये जलवा कहाँ होता ।।
प्यासे थे, दलित सारे
ना पानी दिया किसने ।
आज मंदिरमे ना जाते थे
ओ संग्राम ना किया होता।।
बच्चोंकी तरहा अपने
दलित गरीबोंको पाला है
ओ झगडा नही होता,
तो अरक्षण कहाँ मिलता ।।
ज्यो लोगोने जुल्म किया
ओ लोगोंको माफ किया,
संविधान लिखा उसने,
ऐसा कोईना लिखसकना।।
लाओी है यहाँ समता
बढाई शान उस देश की,
ओ गॅनी नही होता,
तो इस देश का क्या होना।
आज राष्ट्रपती, प्रधानमंत्री
सभापती, मुख्यमंत्री राज्यपाल
और सनदी अधिकारी
भी नही होना ।
ओ तारा नही होता ।
तो ये नारा नही होता

– रचना (बंधु) लक्ष्मण अभंगे

# महामानवाची पहिली जयंती



**"महान कायदेपंडित, शिक्षणतज्ञ, दुरदुष्टीचे पत्रकार, जातीच्या पलिकडे जाऊन भारतीयांचा विचार करणारा एक क्रांतीकारी महान नेता म्हणून डॉ. बाबासाहेबांचे फार मोठे योगदान राहिले आहे. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती भारत देशाबरोबरच जगात आज अनेक देशांमध्ये साजरी केली जात आहे. ही गोष्ट तमाम भारतीयांसाठी अभिमानाची आहे. आज आपण अनेकजण बाबासाहेबांची जयंती साजरी करतो. मात्र पुण्यात पहिली महामानवाची जयंती ९६ वर्षापुर्वी झाली हे आपल्याला विसरता कामा नये."**

**ज्योती क्षीरसागर**



१४ एप्रिल १८९१ हा दिवस भारतरत्न, बौद्धीसत्व, महामानव. भीमराव रामजी सकपाळ तथा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा जन्म दिवस. मध्यप्रदेश मधील महू या गावी आर्मी छावणीमध्ये बाळ भीमरावांचा जन्म झाला. बाबासाहेबांचे वडील ब्रिटिश आर्मीमध्ये सुभेदार म्हणून नोकरी करीत होते. ते शिक्षकही होते. त्यामुळे त्यांची सतत बदली होत असे. रत्नागिरी जिल्ह्यातील मंडणगड तालुक्यात आंबाडवे (आंबावडे) हे त्यांचे मुळ गाव. परंतु नोकरीमुळे त्यांना परिवाराला घेऊन पर गावोगावी सतत जावे लागत. माता भीमाबाई व पिता रामजीबाबा यांचे बाळ भीमराव हे चौदावे मुल. म्हणूनच भीमरावांना चवदावे रत्न असे म्हटले जाते. एक दिवस भीमाई नदिवर कपडे धुण्यासाठी गेल्या होत्या. त्यावेळेस त्यांचे मोठे दिर रामजीबाबांचे मोठे बंधू जे आपले घरदार सोडून संन्यासी होण्यासाठी सर्वांना सोडून गेले होते. ते तिथून जात असता, तिथे त्यावेळेस पाणी पिण्यासाठी आले, ते भीमाईला पाहून आनंदित झाले भीमाईंच्याही चेहेऱ्यावर आनंद दिसत होता. कारण बऱ्याच वर्षांनंतर त्यांची गाठभेट झाली होती. भीमाईने त्यांना घरी येण्यास विनंती केली, पण त्यांनी नकार दिला. बरेवाईट, खुशाली विचारल्यानंतर पाणी पिऊन निघत्या वेळेस ते आपली भावजय भीमाईस म्हणाले की, तुझ्या पोटी असे बाळ जन्मास येईल जे समाजाचे कल्याण करेल, ते मोठे ज्ञानी महामानव होईल असा आशीर्वाद देऊन ते त्यांच्या पुढच्या मार्गाला निघून गेले आणि तो सोनेरी दिवस म्हणजे १४ एप्रिल १८९१ या दिवशी क्रांतिकारी, प्रज्ञावंत, ज्ञानवंत, महामानवाचा जन्म झाला.

महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा एखाद्या जातीसाठी किंवा समाजासाठी नव्हे तर देशासाठी जगासाठीही कल्याणकारी ठरला. असे कोणच नाही की बाबासाहेबांचे ज्यांच्यावर उपकार नाहीत. पण कोणाचीही कुवत तेव्हढी नाही की त्यांच्या उपकारांची परत फेड करू शकेल. बाबासाहेबांचा इतिहास अंगावर शहारे व डोळ्यात पाणी आणणारा आहे. त्यांचा जन्म दिवस अखिल सर्व भीम अनुयायी अर्थात बौद्ध बांधव साजरा करतात. आपल्या सर्वांचा सर्वात मोठा सण म्हणजेच भीम जयंती. देश-विदेशात देखील खूप मोठ्या जल्लोषात भीम जयंती साजरी केली जाते. यंदादेखील भीम जयंती खूप मोठ्या थाटामाटात, जलोषात, उत्साहात साजरी होणार हे नक्की. परंतु सर्व प्रथम महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीची सुरुवात ज्यांनी केली ते बाबासाहेबांचे अनुयायी थोर सामाजिक कार्यकर्ते सन्मानिय जनार्दन सदाशिव रणपिसे (भाऊसाहेब) व त्यांचे सहकारी यांनी १४ एप्रिल १९२८ रोजी खडकी पुणे या ठिकाणी महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची प्रथम जयंती साजरी केली. तेही बाबासाहेब असताना. तेव्हापासून प्रत्येक कानाकोपऱ्यात, गावोगावी, देश विदेशात, प्रत्येक ठिकाणी महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीची सुरुवात झाली. त्यावेळेस बाबासाहेबांची प्रतिमा (फोटो) त्यांनी हत्तीच्या अंबारीवर विराजमान केली आणि प्रभात फिल्म कंपनीच्या रथातून, उंटावरून भव्य दिव्य प्रचंड अशी खडकी विभाग पुण्यातून मिरवणूक काढून जयंती साजरी केली.

या जयंतीत लाखो अनुयायी, कार्यकर्ते उपस्थित होते. सन्मानिय जनार्दन सदाशिव रणपिसे हे महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जन्म दिवस समारंभाचे शिल्पकार ठरले. ज्या काळात शिकण्याच्या सोयी व सवलती उपलब्ध नव्हत्या. त्या काळात पुणे जिल्ह्यातील दलित समाजातील ते पहिले मॅट्रीक पास होते. समाजकार्यात त्यांचा मोठा वाटा होता. खडकी पत्र विभाग दलित मंडळाचे अध्यक्ष असताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर या महापुरुषाच्या जयंती करण्याची सुरूवात त्यांनीच सुरु केली आणि अशा तऱ्हेने भारतरत्न, महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी करण्याची सुरुवात झाली.

महामानव भीमराव रामजी सकपाळ तथा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३३ व्या जयंती निमित्त त्यांना विनम्र अभिवादन.....

**मोबाईल नंबर - ९३२४३४४९३९**

# शेतकऱ्यांचे कैवारी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर




श्री. प्रमोद जाधव
सहआयुक्त समाज कल्याण, महाराष्ट्र राज्य

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे व्यक्तीमत्व व कार्य बहुआयामी असे आहे. राज्यघटनेचे शिल्पकार, वंचित शोषित समाजघटकाचे नेते, प्रज्ञासूर्य असे विविध पैलू आपणांस माहित आहेतच. मात्र, ते सर्व जातीजमातीच्या शेतकयांचेही नेते होते. ही बाब आपण लक्षात घेतली पाहिजे. कोकणातील जुलमी खोती व सावकारांच्या विरोधात डॉ. बाबासाहेब आंबेडकर व त्यांच्या सहकाऱ्यांनी दोन दशके जनचळवळ उभारली. या चळवळीतील परमोच्च बिंदू म्हणजे घरी गावाच्या (ता. अलिबाग) परिसरातील चौदा गावांनी तब्बल सात वर्षे सावकारांच्या विरोधात प्रदीर्घ संप केला. या संपूर्ण जनचळवळीचा तपशील मोठा रंजक असा आहे.

**खोती/गुलामगिरी :** कोकणातील जमीन डोंगराळ आहे. तसेच एका बाजूला समुद्र व खाडी आहे. ही जमीन शेतकऱ्यांनी सपाट करुन तसेच समुद्र खाडीला बंधारे बांधून लागवडी योग्य केली. आदीलशहाच्या काळापासून कोकणातील गावामधून जमीन महसूल गोळा करण्यासाठी खोतांची नेमणूक केली. खोतांनी ठराविक महसूल जमा करुन राजाला भरायचा व त्यातील काही भाग स्वतःला ठेवायचा अशी रचना होती. छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळात खोतांवर बंधने होती. तसेच त्यांनी वतने द्यावयाची पध्दत बंद केली होती. मात्र नंतर विशेषतः पेशवाईच्या काळात खोतांनी आपले हातपाय पसरले. महसूल जमा करण्यात मनमानी होऊ लागली.

बहुतेक गावात खोत सावकार म्हणूनही कार्यरत होते. अशिक्षित जनतेला कर्ज देऊन त्याची दामदुपटीने वसुली होऊ लागली. हळूहळू बहुतांश जमिन खोतांच्या मालकीची झाली. व मूळचे शेतकरी कुळ बनले. बहुतांश खोतांनी सुलतानाप्रमाणे वागण्यास व मनमानी करण्यास सुरुवात केली. खोतांनी विविध मार्गांनी बळकावलेल्या जमिनी कुळ कसू लागले. येणाऱ्या उत्पन्नातील बहुतांश वाटा खोत सावकाराला व अत्यल्प वाटा कुळांना मिळत असे. खोतांनी वेठबिगारी पध्दतही सुरु केली. खोतांच्या शेतावर दरवर्षी १० ते ६० दिवस नाममात्र मोबदल्यात राबावे लागे. चिखलप (ता. म्हसळा) येथील एका कुळाने वेठबिगारी करण्यास नकार दिला. त्यामुळे त्याला खोताने चायकाने इतके मारले की, तो मृत्युमुखी पडला. कुळांच्या घरांजवळील फळे, कोंबडया इत्यादी बाबींही खोत उचलून नेत. खोतासमोर तसेच गावात कुळांनी चांगले कपडे घालण्यास बंदी असे. कुळांनी छप्पर म्हणून कौले वापरण्यास बंदी होती. म्हणून भाताचा पेंढा वापरणे सक्तीचे होते. हा पेंढा खोताकडूनच घ्यावा लागे. पेंढा एक वर्षातून खराब होतो. म्हणजे सहाजिकच कुळांनी खोतांवरच अवलंबून रहावे असा यामागे हेतु होता.

कुळांच्या मुलांनी शिकू नये यासाठी खोत प्रयत्नशील असत कारणं कुळ सुशिक्षित झाल्यास आपली सुलतानी चालू देणार नाहीत याची खोतांना जाणीव होती. खोतांकडे सत्ता व संपत्तीचे अवैध मार्गांनी केंद्रीकरण झाले होते. यामुळे विषमता पसरली होती. याची दोन उदाहरणे देत आहे.

१. भेंडखळ ता. उरण या गावाच्या परिसरातील एकूण ९६० एकर जमिनीपैकी ७०० एकर जमीन त्या गावातील सावकाराकडे होती.

२. कुलाबा (रायगड) जिल्हयात १९ व्या शतकात १,०४,९०८ शेतकऱ्यांकडे २,१३,१९९ एकर जमीन होती. याउलट खोत सावकार जमीनदार अशांचा समावेश असणाऱ्या ५,६९३ व्यक्तीकडे एकूण ४,०३,४४० एकर जमीन होती. विशेष म्हणजे १८७८ साली कुलाबा (रायगड) जिल्हयात ५,९२७ सावकार होते.

या गुलामगिरीमुळे जनता त्रस्त झाली होती. याविरुध्द डॉ. बाबासाहेब आंबेडकर व त्यांचे सहकारी स्व. नारायण नागू पाटील (पेझारी ), सुरबा नाना टिपणीस (महाड), भाई अनंत चित्रे ( पोलादपूर) यांनी व्यापक जनआंदोलन उभे केले. संपूर्ण कोकण भाग त्यांनी पिंजून काढला. सुरबा नाना टिपणीस व भाई अनंत चित्रे स्वतः खोत होते. मात्र, खोती पध्दतीमुळे निर्माण झालेली विषमता व अन्याय त्यांना सहन होत नव्हता. म्हणून ते या चळवळीमध्ये सहभागी झाले. या चळवळीचे अजून एक वैशिष्टय म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे सहकारी ब्राम्हण, मराठा, कुणबी, आगरी इत्यादी तसेच अनुसूचित जातीतील शेतकरी होते.

बाळा बेंडके व त्यांचा मुलगा हे चळवळीत आघाडीवर होते. खोतांना हे सहन न झाल्याने त्यांनी त्यांना जबर मारहाण केली. त्यांत त्यांचा अंत झाला. खोतांनी त्यांचे घरदार, गुरेढोरे, विकली. अक्षरशः रस्त्यावर आलेला त्यांचा मुलगा त्यावेळी आजारी होता. तापाने फणफणलेल्या अवस्थेत भाई चित्रे यांना ही बाब सांगण्यासाठी तो निघाला. मात्र ते ही मृत्युमुखी पडला.

**चरी येथील शेतकऱ्यांचा प्रदीर्घ संप :-**

चरी गावच्या परिसरातील शेतकऱ्यांची परिस्थितीही उर्वरित कोकणपट्टीप्रमाणे होती. बहुतांश जमीन सावकारांनी गिळंकृत केली होती. मूळचे शेतकरी त्यामुळे कुळ / भूदास अवस्थेत आले. सावकार एक लेखी करार ( कबूलायत) करुन घेऊन जमीन कुळांना कसायला देत. त्यातील अटी अतिशय जाचक असत. वीस मणांचा एक खंडी भात असे मोजण्याचे परिमाण होते. यातील बारा मण सावकाराला मिळे. व आठ मण कुळांना मिळे. या आठ मणातील दोन मण धान्य पुढच्या वर्षीसाठी बियाणे म्हणून ठेवावे लागे. म्हणजे प्रत्यक्षात सहा मण धान्य कुळांना मिळे. त्यावेळी धान्याचे आकारमान मोजण्यासाठी फरा हे साधन वापरले जाई. यातही सावकार लबाडी करत. स्वतः धान्य घेताना ते अधिकृत फऱ्यापेक्षा मोठा फरा वापरत. याला सावकाराला पोसणारा म्हणून पोश्या फरा म्हणत. मात्र, कुळांना धान्य देतांना अधिकृत फऱ्यापेक्षा लहान फरा वापरल्या जाई. याला शेतकऱ्यांना नाडणारा म्हणून नाडवा फरा म्हटले जाई. एखाद्या वर्षी दुष्काळ, अतिवृष्टी, टोळधाड असे कोणत्याही कारणामुळे उत्पन्न कमी आले तरीही सावकार त्याचा हिस्सा वसूल करत असे.

या सावकारशाहीने ग्रस्त होऊन १९०५ व १९९२ साली वढ़ाव (ता. पेण) येथे तसेच १९२१-२२ साली वाशी (ता.पेण) येथे संप झाले. भेंडखळ (ता. उरण) येथेही संप झाला. मात्र, ते फार काळ टिकले नाहीत. सन १९२७ साली रावबहादूर सी. के. बोले यांच्या अध्यक्षतेखाली कोकण प्रांत शेतकरी संघाची स्थापना झाली. २४ एप्रिल १९२९ साली चिपळूण येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अध्यक्षतेखाली शेतकरी परिषद भरली. तर २५ डिसेंबर १९३० रोजी पेण येथे स्व. नारायण नागू पाटील व भाई अनंत चित्रे यांच्या नेतृत्वाखाली कुलाबा जिल्हा शेतकरी परिषद भरली. शेतकरी परिषदा बैठका यांचा धडाका सुरु झाला. जनजागृती होऊ लागली. यामुळे ब्रिटीश सरकारने १९३२ साली शेतकरी संघ बेकायदा ठरविला.

१९३४ साली शेतकरी संघावरील बंदी सरकारने उठवली. मग स्व. ना. ना. पाटीलांनी कुलाबा जिल्हा शेतकरी परिषद घरी (ता. अलिबाग) येथे भरवण्याचे निश्चित केले. त्याचे अध्यक्षस्थान भूषविण्याची डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना विनंती केली. ती त्यांनी मान्य केली.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे समुद्रमार्गे रेवस येथे दिनांक १६/१२/१९३४ रोजी आले. रेवस (चंदर), सारळ, हाशिवरे, नारंगी, या गावोगावी त्यांचे शेतकऱ्यांनी मोठया संख्येने जमून स्वागत केले. सुमारे २००० शेतकऱ्यांनी पेझारी चरी या परिसरात शेतकरी मिरवणूक काढली. घरी येथील सभा स्थानी सुमारे ६००० शेतकरी जमले होते. बाबासाहेबांचे भाषणाला सुरु होताच शेतकऱ्यांनी उत्साहात प्रतिसाद दिला. भाषणात त्यांनी पुढील मुद्दे मांडले.

'सद्यस्थितीत मुठभर लोकांकडे जमिनीची मालकी आहे मात्र, ते स्वतः कष्ट करीत नाहीत. मात्र, जे शेतीत कष्ट करीत आहेत. त्यांच्याकडे जमीन नाही. या दोन्ही वर्गात संघर्ष आहे. गेली काही वर्ष परीचे शेतकरी सावकार व जमिनदाराविरुध्द संपावर गेले आहेत. अशाप्रकारचा वाद हा लवादामार्फत मिटविणे आवश्यक आहे. ज्यामध्ये दोन्ही बाजूकडील व्यक्तींना त्यांची बाजू मांडण्याची संधी मिळेल. शासनाने ही यात लक्ष देण्याची गरज आहे.

कोकणातील खोती पध्दतीमुळे शेतकऱ्यांची स्थिती अतिशय दयनीय झाली आहे याची मला जाणीव आहे हा अन्याय यापुढे चालू देता कामा नये. या अमानवी पध्दतीच्या अत्याचाराला शासनही जबाबदार आहे. योग्य पध्दतीचा कायदा करणे हा या सर्व समस्यांवरील कायमस्वरुपी तोडगा आहे. यासाठी तुमच्या हितसंबंधाचे नेहमीच संरक्षण करणारे लोकप्रतिनिधी तुम्ही निवडणूकीत निवडणे आवश्यक आहे.




बाबासाहेबांच्या या भाषणामुळे शेतकऱ्यांमध्ये नवचेतन्य निर्माण झाले. शेतकऱ्यांच्या हिताचे विविध ठराव या परिषदेत मान्य करण्यात आले.काळ पुढे सरकत होता. मात्र महिन्यापासून महिने गेले तरी संप काही मिटेना.

या सर्व प्रश्नावर कायस्वरुपी तोडगा निघावा म्हणून बाबासाहेबांनी खोती पध्दती नष्ट करण्याचे व कसणाऱ्याला जमीनीचे मालकी हक्क द्यावे याबाबतचे विधेयक १७ सप्टेंबर १९३७ रोजी मुंबई विधानसभेत मांडले. मात्र ते त्यावेळी मंजूर झाले नाही. त्यामुळे १० जानेवारी १९३८ रोजी सुमारे १० हजार शेतकऱ्यांचा भव्य मोर्चा बाबासाहेबांच्या नेतृत्वाखाली मुंबईत काढण्यात आला. उन्हात रापलेले देह व फाटकीतुटकी वस्त्रे घातलेले दहा हजार शेतकरी मोर्चात सहभागी झाले होते. आपल्या व्यथा मांडण्यासाठी ठाणे, कुलाबा (रायगड), रत्नागिरी, सिंधूदुर्ग, सातारा, नाशिक या जिल्हयातले शेतकरी यांत प्रामुख्याने सामिल झाले होते.

खोती पध्दती नष्ट करावी, शेतमजूरांना किमान वेतन निश्चित करावे. आर्थिक व सामाजिकदृष्टया शोषण करणाऱ्या खोती, वतनदारी, जमिनदारी या पध्दती मोबदला देऊन किंवा न देता रद्द कराव्यात. व इतर मागण्या या मोर्चाव्दारे करण्यात आल्या. अशाप्रकारे कसेल त्याची जमीन हे तत्व मांडण्यात आले.

शासनाकडे बाजू मांडल्यानंतरच्या सभेत डॉ. बाबासाहेबांनी स्फूर्तीदायी भाषण केले. तुमच्या गरीबीचे मूळ कारण शोषणकर्त्या श्रीमंतांमुळे आहे. तुमच्यावरील अन्याय दूर होण्यासाठी जात पात विसरुन आपण एकत्र यावयास हवे. तुम्ही तुमचे खरेखुरे लोकप्रतिनिधी निवडले पाहिजेत. जेणेकरुन जे धान्य पिकवतात व राष्ट्राची संपत्ती निर्माण करतात ते उपासमारीने मरणार नाहीत, तसेच त्यांना वस्त्र व निवाराही मिळेल.

या तोडग्यानंतर 'जगातला एकमेव, शेतकऱ्यांचा प्रदीर्घ संप' सन १९३९ साली मिटला. या प्रदीर्घ कालावधीत शेतकऱ्यांची प्रचंड वाताहत झाली. चरितार्थाचा मुख्य स्त्रोत बंद झाला. अन्य स्त्रोत नसताना उपासमारीला लढवय्या शेतकऱ्यांनी कसे तोंड दिले याची कल्पनाही करवत नाही.

गुलामाला गुलामीची जाणीव करून द्या, म्हणजे तो बंड करून उठेल हे बाबासाहेब वारंवार सांगत असत. शेकडो व्यक्तींचा समाज जेव्हा एखादा सकारात्मक विचार स्विकारतो. तेव्हा तो विचार हीच एक प्रचंड प्रेरणा शक्ती बनते. व ही शक्ती समाजामध्ये परिवर्तन घडवून आणते. याचे प्रत्यंतर चरी गावाच्या परिसरात आले.

या चळवळीवर प्रकाशझोत टाकावा म्हणून माझे वडील स्व. बळीराम जाधव यांनी जगातील एकमेव, शेतकऱ्यांचा प्रदीर्घ संप या नावाचे पुस्तक सुविधा प्रकाशन पुणे - ३० यांच्यामार्फत प्रकाशित केले आहे. या विषयांची सखोल माहिती मिळण्यासाठी जिज्ञासुंनी या पुस्तकाचे जरूर वाचन करावे,

'उध्दरली कोटी कुळे, भिमा तुझ्या जन्मामुळे' असे सुप्रसिध्द व यतार्थ गीत आहे. यात माझ्या व विविध जातीजमातींच्या असंख्य शेतकरी कुळांचाही समावेश आहे हे मी कृतज्ञतापूर्वक नमूद करतो. **

# मनात चैतन्य निर्माण करणारी कविता : पल्लव

डी. बी. जगत्पुरिया
मो. ९८६०४८५३९८

कविता ही साहित्याची विलक्षण विधा आहे. कवितेने आजपर्यंत अनेक प्रांतातील कवींना पुढे आणलं आहे. कविता मनात झिरपणारी, मनातच कोरली जाऊन कागदावर उमटणारी विधा असते. कविता जडतेला खंडीत करणारा साहित्य प्रकार असतो. 'पल्लव' हा आनंदा वारांगणे या उपक्रमशील अभ्यासू शिक्षकाचा मनात चैतन्य निर्माण करणारा कविता संग्रह आहे. या संग्रहाची मांडणी, सजावट वाचकाचं लक्ष वेधून घेते. अध्यात्माची विशेष ओढ असणाऱ्या या कवीने शेतकऱ्यांच्या श्रमाच्या कविता लिहून लक्ष वेधून घेतलं आहे. निसर्ग, प्रेम विरह यांनाही स्पर्श केला आहे.

अध्यात्माचा विषय मांडत लोक दैवत पांडुरंगाचा ध्यास करणारा कवी म्हणतो -

**' मनी आनंद भऊन गेली**
**ठुमकत साजणी आली ! '**

आनंदल्या मनात, रंग भरणाऱ्या या साजणीचे कवीने सुबक वर्णन केलेय. कष्टावर, शेतकऱ्यांच्या घामावर, मजुरांच्या श्रमावर निष्ठा असणारा कवी म्हणतोय-

**' चल जाऊ जोडीने शेतामधी**
**कष्ट करूया हिरव्या पिकामधी**
**कष्ट करतांना घाम गळतो**
**घामाचा घास गोड लागतो'**

घामाचा घास गोड लागतो असं म्हणत या चिंतनशील कवीने अन्नदात्याच्या श्रमालाच वंदन करीत श्रममूल्याची आठवण करून दिलीय. शेतकऱ्याशिवाय कुणीच मोठा नाही. कारण

**'तूच राबतो भूक घेऊनी**
**तूच गाळतो घाम**
**तुझ्या श्रमाने जागा होतो**
**माणसातला राम !'...... ठिणगी पृ.१८**

असं म्हटलं गेलंय. शेतकऱ्यांच्या श्रमामुळे माणसातला राम म्हणजे माणसातलं सत्त्व जागं होतं हेकोण नाकारेल? कवी पीक आल्यावर रुचकर लागणाऱ्या चवळीचं, मुगाच्या भरदार दाण्याचं, फुललेल्याकपाशीचंही वर्णन करतो. निसर्ग आणि शेतकरी यांची सांगड बेमालूम घालायची कला कवीला साधली आहे.

**'वाहते झुळझुळ पाणी**
**येतात मनात गाणी**
**पायी मऊ वाळू**
**नवे खेळ खेळू '**

कवीच्या यासारख्या लयदार ओळी मनात नवपल्लवी फुलवत मनाला प्रसन्न करून टाकतात. पीक घरी आल्यावर शेतकऱ्यांच्या मनातला भाव हा कवी टिपतो. पेरणी सुरु झाल्यावर मनातलं सोनेरी स्वप्न कवी नेमक्या शब्दांत मांडतो.

**' पायात काटा**
**गाली हसू**
**मनात लपवी डोळ्यांचे आसू**
**बरकत येवो मुठीला तुझ्या'**

अशी बरकतीची श्रीमंत मागणी करत फुगडया खेळणाऱ्या मोहक पावसाचं वर्णन विलोभनीय,रोमांचक आहे. शेतकऱ्यांचं खडतर जीवन या शेतकरी कवीने भोगलं आहे. म्हणूनच हा कवी त्याच्या कष्टबद्ध जीवनाला सौख्याचं फळ लागायची मंगल कामना करतो. निसर्गाच्या प्रच्छन्न सौंदर्याची, अध्यात्माच्या ओढीची, शेतकऱ्यांच्या प्रांजल कष्टाची, सुख सौख्याची





आशयघन कविता कवी वारांगणे यांनी लिहिली आहे. ते पेशाने शिक्षक असले तरी पाट्या टाकून पगाराची वाट पाहणारे पोटार्थी शिक्षक नाहीत. त्यांच्या व्यक्तिमत्त्वात एक पिढी घडवणारा संस्कारक्षम मार्गदर्शक, एक प्रज्ञावान कवीही दडला आहे. हे मुद्दाम नमूद केलं पाहिजे! कवीची भावविभोर कविता प्रेम-सौंदर्य-शृंगाराचाही प्रत्यय देते. म्हणून या संग्रहात

**' येता-जाता चोरून बघता**
**धडकी भरते उरी'**
**' झुळझुळले पाणी गाते मंजुळ गाणी**
**दूर, रानात या पावा वाजवी कुणी**
**मोहीत झाला साजण न्याहाळता कांतीला'**

यासारख्या ओळी वाचायला मिळतात. गरिबाघरच्या शाळेत जाणाऱ्या, चटणी-चिरी भाकरी फडक्यात नेणाऱ्या या कवीने फडके व भाकरीचा सन्मान करून कवितेची श्रीमंती वाढवली आहे! ङ्ङ असेल खिशात जोवर नाणा म्हणतील सारे तुजला नाना जोवर असेल हातात सत्ता गिरवतील सारे तुझा कित्ता असा खूप मोठा सामाजिक संदेश देणाऱ्या कविता लिहून आपली लोकशिक्षकाची भूमिका पार पाडतो. आभाळ थेंबाळतं तेव्हा सुटणारा मातीचा गंध चित्तवृत्तीला फुलवणारा असतो. असं वर्णन या निसर्गकवीने

**'थेंबाळले आभाळ गंध**
**मातीला सुटला**
**कुणब्याच्या मनी कसा**
**आनंद दाटला'**

यासारख्या रचनेतून केलं आहे. 'बाप' या कवितेत जन्मभर राबून कोरोनात मरण पावलेल्या कष्ट उपसणाऱ्या बापाच्या चट्का लावणाऱ्या मृत्यूचं वर्णन केलंय. ते मनाला टोचणारं आहे. कवी आनंदा वारांगणे कलंदर वृत्तीचे कवी आहेत. ते शेती-मातीचं लोभस निसर्गचित्रही रेखाटू शकतात. कारण -

**कविता**
**'दर्पणाचा पारा**
**खळाळती धारा**
**चैतन्याचा वारा असते!'.....ठिणगी पृ.३**

हेते जाणतात. त्यांच्या कवितेत अंगभूत लय आहे. लय विचार म्हणजे कविता अशी कार्लाइलने कवितेची व्याख्या केलीय. अशी लयबद्धता गेयता व नादमयतेमुळे येत असते. सौंदर्याची लयबद्ध निर्मिती म्हणजे काव्य, अशीही कवितेची एक व्याख्या आहे. कवीच्या प्रसन्न करणाऱ्या या ओळी बघा.

**'सोनेरी उन्हात हिरव्या पानात मन नाचलेले**
**मोत्यांची माळ फुलांचा बहर रूप सजलेले'**

जेव्हा ढग धरतीचं चुंबन घेतात तेव्हा मनाला गुदगुल्या होतात अशी कल्पनाही कवीने एका कवितेत केली आहे. कवीने यापुढे सामाजिक आशयाच्या कविता लिहाव्यात अशी अपेक्षा करणे गैर नाही. या उपक्रमशील कवीस खूप शुभेच्छा ! **

# आंबेडकरवादी आंदोलनासाठी आव्हाने व समाधान!

सायराबानू चौगुले

आंदोलने ही भारतीय घटनेनुसार आपले हक्क मिळवण्यासाठी करावी लागतात. त्याआधी आपल्याला आंबेडकरवाद समजून घ्यायला हवा. आंबेडकरवाद हा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांवर, सिद्धांतांवर आधारित एक भारतीय तत्त्वज्ञान किंवा विचार प्रणाली आहे. आंबेडकरवादी एक विचारप्रणाली राजकीय, सामाजिक, धार्मिक तसेच राष्ट्रवादी तत्त्वज्ञान आहे. आंबेडकर वादाचे प्रमुख तत्त्व समानता आहे.

१४ एप्रिल १८९१ मध्ये भीमराव रामजी आंबेडकर यांचा जन्म झाला. भारतीय सामाजिक व्यवस्थेमध्ये अगदी तळागाळातील जातीवादी विषमता त्यांनी स्वतः अनुभवली होती. या विषमतेविरुद्ध त्यांच्या मनामध्ये चिड निर्माण झाली होती. आपल्या बांधवांना या जातीच्या जाळ्यातून मुक्त करण्यासाठी अहोरात्र जागून अभ्यास करून रस्त्यावरील दिव्याच्या उजेडात प्रसंगी वडापाव खाऊन अनेक पदव्या मिळवल्या. अनेक देशांच्या घटनांचा अभ्यास केला. डॉ बाबासाहेब आंबेडकर न्यायशास्त्रज्ञ, अर्थशास्त्रज्ञ, समाजसुधारक आणि राजकीय नेते होते. त्यांनी समानतावादातून भारतीय राज्यघटनेचा मसुदा तयार करणाऱ्या समितीचे नेतृत्व केले होते. आंबेडकरावादामध्ये लोकशाही, समाजवाद आणि संविधानासह स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या तत्त्वांचा समावेश आहे. आंबेडकरांच्या तत्त्वज्ञानाचे पालन करणारा आंबेडकरवादी होय.



आपला भारत देश प्राचीन देश आहे . त्याला आधुनिक राष्ट्रात रूपांतर करायचे आहे, या हेतूने आंबेडकरांनी दोन वर्ष अकरा महिने १८ दिवस, आपल्या प्रकृतीची तमा न बाळगता समाजातील सर्व घटकांना न्याय देणारे अनमोल संविधान भारताला दिले आहे. ज्याचा मुख्य गाभा समानता आहे. भारतीय संविधान स्वीकारून अंमलात आणून सत्तर वर्षे उलटून गेली तरी त्यातील तत्त्वे, मूल्ये समाजामध्ये , भारतीय नागरिकांमध्ये किती रुजली? हा संशोधनाचा विषय आहे.

समाजवादी, धर्मनिरपेक्ष गणराज्य सामाजिक, आर्थिक, राजनीतिक न्याय प्रत्येकाला मिळाला का? विचार, अभिव्यक्ती, विश्वास, श्रद्धा व उपासना यांचे संपूर्ण स्वातंत्र्य आजच्या नागरिकाला आहे का ? दर्जाची व संधी समानता मिळाली का? व्यक्तीची प्रतिष्ठा व राष्ट्राची एकता आणि एकात्मता यांची आश्वासन देणारी बंधुता आपल्यामध्ये प्रवर्धित झाली का? यांचा विचार करून या सर्व तत्त्वांसाठी भारतीय नागरिकास वेळोवेळी आंदोलने करावी लागतात. या आंदोलनासमोर मोठी आव्हाने आहेत . अजूनही आपले अधिकाधिक बांधव, समाज निरक्षर आहेत.

संविधान साक्षर ही तर दूरची बाब ठरेल. प्रत्येक नागरिक हा संविधान साक्षर व्हायला हवा. त्यासाठी शालेय अभ्यासक्रमात संविधानाचा समावेश व्हायला हवा. अगदी बाल्यावस्थेपासूनच घरामध्ये लोकशाही वातावरण ठेवले जायला हवे. आणि शाळेच्या पहिल्या इयत्तेपासूनच संविधानाचे डोस अभ्यासातून पाजले गेले पाहिजेत तरच प्रत्येक नागरिक पदवीधर होऊन शालेय शिक्षण घेऊन बाहेर पडणारा भारतीय नागरीक वयाच्या २२-२३ व्या वर्षीचा विद्यार्थी स्वजाणीव, देश जाणीव, राष्ट्रहित, माहीत असलेला सुजाण नागरिक बाहेर पडेल. भारतीय राजकीय, सामाजिक व्यवस्था अशी आहे की जाणीवपूर्वक संविधानापासून लोकांना दूर ठेवणारी आहे. हातावर मोजता येणाऱ्या प्रस्थापित लोकांकडून स्वतःचे वर्चस्व टिकवून ठेवण्यासाठी हे होत असल्याचे चित्र आज तरी आहे. आपण सर्व हे घाण्याच्या बैलाच्या डोळ्यावर जशी झापड लावलेली असते तशीच झापड लावून कानही बंद ठेवून या प्रस्थापितांच्या मागे मार्गक्रमण करत आहोत. हे सर्व मार्ग आपल्या अधोगतिकडे जाणारे आहेत याची साधी जाणीव ही स्वातंत्र्य मिळून ७० वर्षे झाली तरी आपल्याला नाही. हेच स्वातंत्र्य, समता, बंधुता, न्याय, हक्क मिळवण्यासाठी वेळोवेळी आंदोलने होणे गरजेचे आहे. आज दडपशाहीचे धोरण अवलंबलेल्या शासनाकडून संविधानाची पायमल्ली होत असताना दिसते आहे. हे पाहत असताना मनाला अतिव वेदना होतात.

संविधानातील तत्वे म्हणजेच आंबेडकरवाद आहे. सर्वांना समान संधी देणारा, व्यक्तीला एक माणूस म्हणून जगण्याचा अधिकार व स्वातंत्र्य देणारा आंबेडकरवाद आहे. सद्य परिस्थितीमध्ये आंबेडकरवादी आंदोलनासमोर खूप मोठी आव्हाने आहेत. समाज संविधान साक्षर करणे हे काम खुप महत्त्वाचे आहे. समाज संविधान साक्षर झाला तरच समाजाला आंबेडकर कळतील तरच तो आपल्या न्याय हक्कासाठी लढेल. संविधान जागृतीपासून कोसो दूर असणाऱ्या समाजाकडून कोणत्या आणि कशा आंदोलनाची अपेक्षा करणार?

आज व्यक्ती स्वातंत्र्यावर गदा येत आहे. कोणताही धर्म, जात सुरक्षित नाही. जाती-जातीमध्ये मुद्दाम भांडणे लावण्याचे काम चालू आहे. समाजामध्ये गरीब श्रीमंत अशी दरी पडली आहे. एकीकडे कोट्याधीश नोटांच्या गादीवर लोळत आहेत तर दुसरीकडे दोन वेळेचे अन्नही पोटासाठी मिळणे दुरापास्त झाले आहे. कायद्याचा उपयोग ही लोकांना मुद्दाम त्रास देण्यासाठी केला जात आहे. तर स्वतःसाठी कायद्यापासून पळवाटाही शोधल्या जात आहेत.आंबेडकरवादी आंदोलने यशस्वी होण्यासाठी प्रत्येक नागरिकाला आंबेडकर व संविधान समजणे खूप महत्त्वाचे आहे, तेव्हाच भारतीय नागरिकाला, शासनाला आपली कर्तव्य बजावली तरच हक्काविषयी लढण्याचा अधिकार प्राप्त होईल आणि मगच तो लढण्यास सज्ज होईल.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी त्यांच्या समाजाच्या उद्धारासाठी जो धर्म शिकविला शिकवण दिली त्यापैकी एक म्हणजे 'शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा' या मुलमंत्रांच आणि त्यांनी दिलेल्या शिकवणीचे पालन करणारी माणसं म्हणजे आंबेडकरवादी. सर्व व्यक्तीप्रती समभाव ठेवत जगावे हा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा मूळ दृष्टिकोन आहे.याचे पालन करणे म्हणजेच आंबेडकरवादी असणे. भारतीय राज्यघटनेला मानणे म्हणजे देखील आंबेडकरवादी असणे होय. **

निवडक

## मॅकगर्कची रेकॉर्डब्रेक खेळी

**लखनौ :** आयपीएल २०२४ स्पर्धेत शुक्रवारी दिल्ली आणि लखनौ या सामन्यात दिल्लीच्या विजयात युवा जॅक फ्रेझर-मॅकगर्कने मोलाचा वाटा उचलला. लखनौने दिल्लीसमोर १६८ धावांचे आवाहन ठेवले होते. या आवाहनाचा पाठलाग करताना दिल्लीसाठी फ्रेझर-मॅकगर्कने ३५ चेंडूत २ चौकार आणि ५ षटकारांसह ५५ धावांची खेळी केली. विशेष म्हणजे हा त्याचा पहिलाच आयपीएल सामना होता. खरंतर तो आयपीएल लिलावात अनसोल्ड राहिला होता. परंतु, लुंगी एन्गिडी दुखापतीमुळे बदली खेळाडू म्हणून संधी दिली.

## भारताचा चौथा पराभव

**पर्थ :** भारतीय हॉकी संघाच्या पराभवाची मालिका शुक्रवारीही कायम राहिली. १-० अशी आघाडी घेतल्यानंतरही भारताला ऑस्ट्रेलियाकडून ३-१ अशा फरकाने पराभवाचा सामना करावा लागला. ऑस्ट्रेलियाने पाच सामन्यांच्या मालिकेत ४-० अशी आघाडी घेतली. भारताला सलग चार सामन्यांत पराभवाची नामुष्की ओढवली. हरमनप्रीतने पेनल्टी कॉर्नरवर गोल केला. ऑस्ट्रेलियाच्या हायवर्ड जेरेमी याने गोल करीत बरोबरी साधली. पुन्हा हायवर्ड जेरेमी व वेल जॅक यांनी गोल करीत ऑस्ट्रेलियाचा विजय पक्का केला.

## मेरी कॉमचा राजीनामा

**नवी दिल्ली :** तब्बल सहा वेळा वर्ल्ड चॅम्पियन राहिलेली भारताची बॉक्सर एमसी मेरी कॉमने शुक्रवारी पॅरिस ऑलिम्पिकसाठी भारताच्या अभियानाचे प्रमुख पद सोडले. मेरी कॉमने भारतीय ऑलिम्पिक संघाची अध्यक्ष पीटी उशा यांना पत्र लिहूलन आपण वैयक्तिक कारणामुळे हे पद सोडत असल्याचे सांगितले. पत्रात लिहिले की, देशाची कोणत्याही स्वरूपात सेवा करणे ही अभिमानाची बाब असते. मी हे पद स्विकारण्यासाठी मानसिकदृष्ट्या तयार होते. मी ही जबाबदारी घेऊ शकत नाही. मी वैय्यक्तिक कारणामुळे हे पद सोडत आहे.

## धोनीसाठी अजब पराक्रम

**चेन्नई :** मागील वर्षी एका चाहत्याने धोनीला पाहण्यासाठी बाईक विकून आलेल्या पैशाने चेन्नईच्या मॅचची तिकीट विकत घेतली होती. याचदरम्यान आता एका चाहत्याने धोनीला बघण्यासाठी तिकीट मिळू शकले नाही, म्हणून तिकीटांचा काळाबाजार करणाऱ्यांकडून ६४ हजार रुपयांची सामन्याची तिकीट विकत घेतली. आणि आता त्याला मुलीच्या शाळेची फी भरायची आहे, ती रक्कम तिकीटांसाठी खर्च केली. पण या चाहत्याला आणि त्याच्या मुलींना मैदानावर खेळताना धोनीची एक झलक पहायची होती.

## सुमित नागल बाहेर

**नवी दिल्ली :** भारताचा अव्वल टेनिसपटू सुमित नागल रोलेक्स मॉन्टे कार्लो मास्टर्समधून बाहेर पडला आहे. त्याला दुसऱ्या फेरीत जागतिक क्रमवारीत सातव्या क्रमांकावर असलेल्या होल्गर रुनेने पराभूत केले. यासह भारताचे स्पर्धेतील आव्हान संपुष्टात आले. गुरुवारी दुसऱ्या फेरीत पावसाने व्यत्यय आणलेल्या सामन्यात रुनेने दोन तास ११ मिनिटे रंगलेल्या सामन्यात नागलचा ६-३, ३-६, ६-२ असा पराभव केला.

# धाक्सूद चिल्हे संघ ठरला अंतिम विजेता

## वरसगांव संघ उपविजेता



**। कोलाड । वार्ताहर ।**

**रोहा तालुक्यातील खांब विभागातील धाक्सूद क्रीडा मंडळ चिल्हे यांच्यावतीने तसेच कोलाड कब्बडी असो. यांच्या मान्यतेने चिल्हे येथे विभागीय कबड्डी स्पधचे आयोजन करण्यात आले होते. या सामन्यांत अंतिम फेरीचा सामना चिल्हे विरुद्ध वरसगांव यांच्यात रंगला. धाक्सूद चिल्हे संघानी वरसगांव संघाचा पराभव करत अंतीम विजेतेपद पटकावले, तर वरसगाव संघाला उपविजेतेपदावर समाधान मानावे लागले.**

यावेळी स्पर्धेचा शुभारंभ सरपंच रविंद्र मरवडे यांच्या हस्ते करण्यात आला. याप्रसंगी प्रमोद लोखंडे, अनिल महाडिक, संदीप महाडिक, उमेश लोखंडे, ठमाजी महाडिक, विनायक महाडिक, राम महाडिक, विलास शिंदे, विनायक शिंदे, तुकाराम कोंडे, रविंद्र लोखंडे, डॉ.श्याम लोखंडे, मारूती खांडेकर, महेश ठाकुर, सानप, मंगेश लोखंडे, अशोक खांडेकर, मधुकर कोठेकर, नारायण महाडिक, प्रभाकर शिंदे, सुनील महाडिक, अनंत म हाडिक, संतोषमहाडिक, वासुदेवमहाडिक आदी कब्बडी खेळाडू तसेच रसिक प्रेक्षक बहुसंख्येने उपस्थित होते.

उत्साही वातावरणात संपन्न झालेल्या या स्पर्धेतील धाक्सूद चिल्हे विरुद्ध स्वयंभु वरसगाव हा अंतीम फेरीतील सामना मोठ्या चुरशीची व अटीतटीचा झाला. या सामन्यात धाक्सूद चिल्हे संघाने बाजी मारत वरसगांव संघाला पराजीत करून अंतीम विजेतेपद पटकावले. तर, वरसगांव संघाला उपविजेतेपदावर समाधान मानावे लागले. तसेच, गावदेवी बाहे तृतीय क्रमांकाचा मानकरी, तर उम्बर्डी संघ चतुर्थ क्रमांकाचा मानकरी ठरला.

यावेळी धाक्सूद चिल्हे संघाचा सनी कोठेकर मलिकावीर, हरिश हलद उत्कृष्ठ पक्कड, तर, वरसगाव संघाचा राज आंब्रुसकर हा उत्कृष्ठ चढाई बहाद्दर ठरला आहे. यावेळी विजेत्या संघाला रोख पारितोषिक आणि चषक देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला. स्पर्धा यशस्वी करण्यासाठी धाक्सूद चिल्हेच्या सर्व पदाधिकारी यांनी अथक परिश्रम घेतले.

## रोहित चेन्नईमध्ये जाणार?



**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

आयपीएल २०२४ आधी मुंबई इंडियन्स संघात झालेला नेतृत्व बदल गेल्या अनेक दिवसांपासून चर्चेचा विषय ठरत आहे. मुंबईने या आयपीएल हंगामापूर्वी संघाच्या नेतृत्वपदी रोहित शर्माला हटवत हार्दिक पांड्याची नियुक्ती केली. त्यामुळे अनेक चाहत्यांना हा निर्णय पटला नाही. रोहितला हटवून हार्दिकला कर्णधार केल्याने मुंबईच्या संघव्यावस्थापनेवरही मोठ्या प्रमाणात टीका झाली. या घटनेनंतर रोहित पुढीलवर्षी मुंबई इंडियन्स संघ सोडणार की नाही, याबाबत चर्चांना उधाण आले. अनेकांनी रोहितने चेन्नई सुपर किंग्स संघात जावे किंवा सरायझर्स हैदराबाद संघात जावे, असंही म्हटलं.

त्यातच आता इंग्लंडचा माजी कर्णधार मायकल वॉननेही असे म्हटले आहे की, रोहितने चेन्नई संघात जावे आणि नेतृत्वही करावे. तसेच, बिअरबायसेप्स पॉडकास्टमध्ये बोलताना वॉन म्हणाला, रोहित चेन्नई संघात जाईल आणि धोनीची जागा घेईल. गायकवाड यावर्षी नेतृत्व करत आहे, कदाचित रोहितने पुढीलवर्षी जबाबदारी सांभाळेपर्यंत हा एक मार्ग असू शकतो. मी रोहितला चेन्नईमध्ये पाहातो.

याशिवाय रणवीरने म्हटले की, चाहत्यांसाठी रोहितला नेतृत्वपदावरून काढणे निराशाजनक होते. तसेच, त्याने म्हटले की, रोहित यापूर्वी डेक्कन चार्जर्सकडून खेळला असल्याने तो जर हैदराबाद संघात गेला, तरी आनंदच आहे.

# डोपिंगमध्ये अडकवण्याचा मोठा कट

## विनेश फोगटचा गंभीर आरोप

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

कुस्तीपटू विनेश फोगटने आज गंभीर आरोप केला की, भारतीय कुस्ती महासंघ तिच्या सपोर्ट स्टाफला मान्यता पत्र न देऊन तिला ऑलिम्पिकमध्ये खेळण्यापासून रोखू इच्छित आहे. तर, फेडरेशनचा दावा आहे की, तिने अंतिम मुदतीनंतर अर्ज केला होता. विनेशने तिच्याविरुद्ध डोपिंगचे कट रचले जाण्याची भीतीही व्यक्त केली. २९ वर्षीय विनेशने २०१९ आणि २०२२ वर्ल्ड चॅम्पियनशिपमध्ये ५३ किलोमध्ये कांस्यपदक आणि २०१८ आशियाई क्रीडा स्पर्धेत ५० किलोमध्ये सुवर्णपदक जिंकले.



पुढील आठवड्यात किर्गिस्तानमधील बिश्केक येथे होणाऱ्या आशियाई पात्रता स्पर्धेत तिला ५० किलोमध्ये ऑलिम्पिक कोटा गाठायचा आहे.

### फिजिओला मान्यता पत्र जारी

पतियाळा येथे झालेल्या निवड चाचणीतही तिने ५३ किलो वजनी गटात भाग घेतला होता पण उपांत्य फेरीत तिचा पराभव झाला होता. भारतीय कुस्ती महासंघ ने सांगितले की प्रशिक्षक आणि फिजिओला मान्यता पत्र जारी करण्यासाठी विनेशचा ईमेल १८ मार्च रोजी प्राप्त झाला होता. परंतु, तोपर्यंत खेळाडू, प्रशिक्षक आणि वैद्यकीय कर्मचाऱ्यांची यादी युनायटेड वर्ल्ड रेसलिंगला पाठविली गेली होती. नोंदणीची अंतिम तारीख ११ मार्च होती.

### मला डोपमध्ये अडकवण्याचा कट

विनेशने एका पोस्टमध्ये लिहिले की, ब्रिज भूषण आणि त्याचा डमी संजय सिंग मला ऑलिम्पिकमध्ये खेळण्यापासून रोखण्यासाठी सर्व प्रकारे प्रयत्न करत आहेत. संघात नियुक्त केलेले प्रशिक्षक ब्रिजभूषण आणि त्यांच्या संघाचे सर्व आवडते आहेत, त्यामुळे माझ्या सामन्यादरम्यान ते माझ्या पाण्यात काहीतरी मिसळून मला प्यायला लावतील हे नाकारता येणार नाही. तसेच, मला डोपमध्ये अडकवण्याचा कट असू शकतो, असे म्हटल्यास चुकीचे ठरणार नाही. आमचा मानसिक छळ करण्यात कोणतीही कसर सोडली जात नाही. एवढ्या महत्त्वाच्या स्पर्धेपूर्वी आपल्यावर होणारा असा मानसिक छळ कितपत न्याय्य आहे?

## रोहितची निवृत्तीबाबतची घोषणा

■ **एकदिवसीय विश्वकरंडक खेळण्याची इच्छा**

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

भारतीय क्रिकेट संघाचा ३६ वर्षीय कर्णधार रोहित शर्मा याला आणखी काही वर्षे क्रिकेट खेळायचे आहे. सध्या तरी निवृत्तीचा विचार मनामध्ये नाही. २०२७ मधील एकदिवसीय विश्वकरंडक खेळण्याची इच्छा आहे, असे स्पष्ट मत रोहित शर्मा याने यू-ट्युबवरील एका शोमध्ये व्यक्त केले.

रोहित याप्रसंगी म्हणाला, मी लहानपणापासून एकदिवसीय विश्वकरंडकाचा थरार बघतच मोठा झालो आहे. त्यामुळे माझ्यासाठी एकदिवसीय विश्वकरंडकच महत्त्वाचा आहे. याशिवाय २०२५ मध्ये जागतिक कसोटी अजिंक्यपद स्पर्धेचा अंतिम सामनाही खेळायला आवडेल. या स्पर्धेच्या अंतिम फेरीत भारतीय संघ पोहोचायला हवा.



आयुष्यात पुढे काय होईल हे सांगता येत नाही. माझ्याकडून चांगली कामगिरी होत आहे. त्यामुळे सध्या तरी मी निवृत्तीचा विचार केलेला नाही. देशाला एकदिवसीय विश्वकरंडक जिंकून द्यायचा आहे.

## साई झालखंड क्रिकेट स्पर्धा

# शिवसाई मापगांव संघ विजेता



**। सोगांव । वार्ताहर ।**

अलिबाग तालुक्यातील झालखंड येथील साई झालखंड संघाने चोरोंडे क्रिकेट मैदानावर दि. ४ ते ७ एप्रिल असे चार दिवसीय भव्य क्रिकेट स्पर्धा आयोजित केल्या होत्या.

या क्रिकेट स्पर्धेत एकूण ४० संघांनी सहभाग घेतला होता. यावेळी अंतिम सामना शिवसाई मापगाव संघ व कपाळेश्वर कावाडे संघात होऊन शिवसाई मापगाव संघाने बाजी मारत प्रथम क्रमांक पटकावला. कपाळेश्वर कावाडे संघाने द्वितीय क्रमांक, साई झालखंड संघाने तृतीय क्रमांक, सातघर संघाने चतुर्थ क्रमांक तसेच, पाचवा क्रमांक वाघेश्वर वाघ्रण संघाने पटकावला. यावेळी स्पर्धेचा मालिकावीर वाघेश्वर वाघ्रण संघाचा निखिल पाटील, उत्कृष्ट गोलंदाज शिवसाई मापगांव संघाचा प्रसाद राऊत तर, उत्कृष्ट फलंदाज म्हणून साई झालखंड संघाचा अक्षय कदम याला सन्मानित करण्यात आले. तसेच, स्पर्धेचा सिक्सर किंग म्हणून साई झालखंड संघाचा अक्षय कदम, चौकार किंग म्हणून कपाळेश्वर कावाडे संघाचा अक्षय म्हात्रे यांचा गौरव करण्यात आला.

या सर्व विजेत्या संघांना व खेळात उत्कृष्ट कसब दाखविणाऱ्या खेळाडूंना मान्यवरांच्या हस्ते रोख रकमेचे पारितोषिक व चषक देऊन गौरविण्यात आले. स्पर्धेत समालोचन यासीन मर्चंट, कपिल पाटील, निखिल पडते, इमरान बुखारी यांनी उत्कृष्टरीत्या करत खेळाडूंची व क्रिकेट रसिकांची मने जिंकली. स्पर्धा काळात कोणताही वादविवाद न होता अतिशय खेळीमेळीच्या वातावरणात संपन्न झाल्या.

# टी-२० विश्वचषकाच्या अँथमची घोषणा

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेने टी-२० वर्ल्डकप २०२४ स्पर्धेच्या अँथमची घोषणा केली आहे. या स्पर्धेला ५० दिवसांचा कालावधी राहिला असल्याने आयसीसीने या अँथमचा टीझर शुक्रवारी (दि.१२) प्रक्षेपीत केला.

२ जूनपासून कॅरेबियन बेट (वेस्ट इंडिज) आणि अमेरिकेत सुरू होणाऱ्या या टी-२० वर्ल्डकपच्या अँथमचे निर्माता मायकल मटॅनोफ मोटॅनो आहेत. या अँथममध्ये अनेक सुपरस्टार असणार आहेत, अशी माहिती आयसीसीने दिली आहे. दरम्यान, या अँथममध्ये ग्रॅमी पुरस्कार विजेता सीन पॉलही दिसणार असून त्यांच्यासह केस डायफेन्थॉलरही गाणार आहेत. डायफेन्थॉलर जगभरात केस म्हणून ओळखला जातो, तो त्रिनिदाद आणि टोबॅगोमधील केस द बँडचा प्रमुख गायक आहे. या अँथममध्ये कॅरेबियन ताल आणि आंतरराष्ट्रीय ढंग असे मिश्रण पाहायला मिळणार आहे.

# कराटे प्रशिक्षक गायकवाड यांना पुरस्कार

**। रसायनी । वार्ताहर ।**

ऑल इंडिया स्पोर्ट्स फेडरेशन व इंग्लिश मिडीयम स्पोर्ट्स असोसिएशन महाराष्ट्र यांनी ऑल इंडिया स्पोर्ट्स डायमंड अवार्ड या पुरस्कारांची घोषणा केली. या पुरस्कारांचे वितरण कृष्णसागर हॉटेल, बारामती येथे प्रदान करण्यात आले.

ऑल इंडिया स्पोर्ट्स फेडरेशनने २०२३-२४साठीच्या राष्ट्रीय क्रीडा पुरस्काराची घोषणा केली. त्यामध्ये सिकेटी महाविद्यालय खांदा कॉलनी व एसएमडीएल महाविद्यालय कळंबोली येथील मार्शल आर्ट ऍक्टिव्हिटीचे प्रमुख प्रशिक्षक माननीय भूपेंद्र शिवाजी गायकवाड यांची ऑल इंडिया स्पोर्ट्स डायमंड अवॉर्ड २०२४ साठी निवड झाली.



ऑल इंडिया स्पोर्ट्स फेडरेशन व इंग्लिश मिडीयम स्पोर्ट्स असोसिएशनचे अध्यक्ष आशिष डोईफोडे व उपाध्यक्ष इंगोले पाटील तसेच पुरस्कार वितरण कार्यक्रमाचे अध्यक्ष, प्रसिद्ध सिने अभिनेते, कार्याध्यक्ष महाराष्ट्र राज्य अँटी करप्शन सोशल ब्युरो कमिटी, सल्लागार कुरबर/धनगर महासंघ कर्नाटक राज्य, ॲड. महेश देवकाते पाटील व बारामतीचे पोलीस उपनिरीक्षक राऊत आदी मान्यवरांच्या हस्ते पुरस्काराचे वितरण करण्यात आले.

आजपर्यंत त्यांनी हजारो मुला मुलींना मार्शल आर्टचे प्रशिक्षण दिले. अतिशय उत्कृष्ट, मेहनती व उदरमतवादी प्रशिक्षक आहेत.

# बुद्धिबळ स्पर्धेत फिरुझाकडून गुकेश पराभूत

## ■ प्रज्ञानंद, विदितच्या लढती बरोबरीत

**। टोरंटो । वृत्तसंस्था ।**

भारताचा ग्रँडमास्टर डी. गुकेशला कॅन्डिडेट्स बुद्धिबळ स्पर्धेच्या सातव्या फेरीत फ्रान्सच्या अलिरेझा फिरुझाकडून पराभव पत्करावा लागला. यासह त्याने गुणतालिकेतील संयुक्त अग्रस्थानही गमावले. त्याचवेळी इयान नेपोम्नियाशीने तुल्यबळ हिकारू नाकामुराला बरोबरीत रोखत एकूण ४.५ गुणांसह आघाडी मिळवली. खुल्या विभागातील अन्य भारतीय बुद्धिबळपटू आर. प्रज्ञानंद आणि विदित गुजराथी यांना या फेरीत बरोबरीवर समाधान मानावे लागले.



सातव्या फेरीपूर्वी गुकेश आणि नेपोम्नियाशी यांचे प्रत्येकी चार गुण होते. या फेरीत नेपोम्नियाशी आणि नाकामुरा यांच्यातील लढत बरोबरीत सुटल्याने गुकेशकडे एकट्याने अग्रस्थान मिळवण्याची संधी होती, पण ती त्याला साधता आली नाही. वेळ कमी असल्याने गुकेशला चाली रचण्यासाठी घाई करावी लागली आणि त्याच्याकडून चुका घडल्या. त्यामुळे त्याला या स्पर्धेतील आपला पहिला पराभव पत्करावा लागला. दुसरीकडे, प्रज्ञानंदने अमेरिकेच्या अनुभवी फॅबियानो कारुआनाला बरोबरीत रोखले, तर नाशिककर विदितने अझरबैजानच्या निजात अबासोवविरुद्ध बरोबरीवर समाधान मानले. अबासोवला या स्पर्धेत सर्वात खालचे मानांकन असून गेल्या दोन फेऱ्यांमध्ये त्याला गुकेश आणि प्रज्ञानंदने पराभूत केले होते.

### महिला विभागात भारताला अपयश

आर. वैशालीला कामगिरी उंचावण्यात पुन्हा अपयश आले. तिला स्पर्धेतील एकूण तिसरी आणि सलग दुसरी हार पत्करावी लागली. चीनच्या ले टिंगजीने वैशालीला पराभूत केले. तसेच, कोनेरू हम्पीची पहिल्या विजयाची प्रतीक्षा कायम राहिली. तिला ॲना मुझिचुकने बरोबरीत रोखले. या निकालांनंतर महिला विभागातील भारताचे आव्हान जवळपास संपुष्टात आले आहे. चीनची टॅन झोंगी पाच गुणांसह अग्रस्थानी असून दुसऱ्या स्थानावरील अलेक्झांड्रा गोर्याचकिनाचे ४.५ गुण आहेत.

Spend your Holidays on the Badminton court
UV SPORTS ACADEMY
BADMINTON SUMMER CAMP -2024
*Organize by - UV SPORTS ACADEMY
*Coaching by - VIJAY JADHAV BADMINTON ACADEMY
Starting from 15 April to 30 May.
Features:
* Coaching Module Developed by NIS badminton Mr.Vijay Jadhav. (International Para Badminton player)
* Summer Camp for beginners.
* Coaching by expert coaches.
* Guidance on proper diet.
Special LADIES Batch
*FEE* 1800
*Batches* Morning 7 to 9 am Evening - 5 to 7 & 7 to 9 pm
*Contact*
Vijay-7066662323,
Shreya- 7385741955
Manisha-7745011000,
Tanvi- 8180085164
*Venue*
UV SPORT ACADEMY
At-Bandhan-Pezari, Post- Poynad, Alibag-Raigad.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ. चित्रलेखा पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ I MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ **संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील** ■ **सल्लागार संचालक : सौ. सुप्रिया पाटील** ■ **व्यवस्थापकीय संचालक : सौ. चित्रलेखा पाटील** ■ **कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत*** ■ **सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)